# सुवर्ण प्रतिमा



१९६२-२०१३

महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवाची पन्नास वर्षे



सत्यमेव जयते

# सुवर्ण प्रतिमा

महाराष्ट्र राज्य चित्रपटमहोत्सवाची पन्नास वर्षे

महासंस्कृती

संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,
महाराष्ट्र शासन

**संकल्पना**
मा. ना. श्री. संजय देवतळे
मंत्री, सांस्कृतिक कार्य
मा. ना. श्रीमती फौजिया खान
राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य
**मार्गदर्शक**
श्रीमती मेधा गाडगीळ
प्रधान सचिव,भा.प्र.से.
**विशेष सहाय्य**
श्री. संजय भोकरे
उपसचिव
श्रीमती अलका पाटील
अवर सचिव
श्रीमती गीता कुलकर्णी
अवर सचिव
**प्रकाशक**
श्री. आशुतोष घोरपडे
संचालक, सांस्कृतिक कार्य
**सल्लागार मंडळ**
इसाक मुजावर
सुधीर नांदगांवकर
**संपादक मंडळ**
अशोक राणे
ललिता ताम्हणे
दिलीप ठाकूर
शीतल करदेकर
**समन्वयक**
मीनल जोगळेकर
रमेश पांचाळ
निलेश धुमाळ, मिलिंद शिंदे, धीरज बिर्जे
**मांडणी व सजावट**
रघुवीर कुल
**मुखपृष्ठ छायाचित्र**
रुद्रमणी कांबळे
**टाईपसेटिंग**
चंद्रकांत गुळुंबे, सुनील मोरगावकर
**मुद्रक**
सुरेश तिकोने
रचना मुद्रण, दादर, मुंबई-१४.

# अनुक्रम

**संपादकीय** १

**हलत्या चित्रांचा विजय असो!**
परेश मोकाशी ४

**भारतीय सिनेमाच्या इतिहासातील मानदंड!**
रेखा देशपांडे ७

**भारतीय सिनेमाचे सर्वात राजस स्वप्न**
रेखा देशपांडे ९

**महोत्सवातून उत्साहाची संजीवनी लाभली**
सुधीर नांदगांवकर ११

**मी स्वत:ला भाग्यवान समजते - सुलोचना**
शब्दांकन: शीतल करदेकर १४

**विक्रमी पार्श्वगायिका - आशा भोसले**
ललिता ताम्हणे १८

**शाबासकीची थाप**
सीमा देव २१

**दिवस चांगले आलेत! - राजदत्त**
शब्दांकन: शीतल करदेकर २३

**मी रंगभवन धोबीतलाव**
दिलीप ठाकूर २७

**शासनाच्या योजनेमुळे चित्रपटसृष्टीची प्रगती**
प्रसाद सुर्वे ३१

**राज्य पुरस्काराचे श्रेष्ठत्व निर्विवाद**
सतीश रणदिवे ३२

**'श्वास'नंतरचा मराठी सिनेमा**
संतोष पाठारे ३४

**मराठी चित्रपटसृष्टी... एक मुक्त चिंतन**
अशोक राणे ३९

**फोटो गॅलरी** ??

**पारितोषिक विजेते** (१९६२-२०१२) ??

*वरील सर्व लेखांमध्ये व्यक्त झालेली मते, ही लेखकांची वैयक्तिक मते असून शासन त्याच्याशी सहमत असेलच, असे नाही.*

# शुभेच्छा संदेश

महासंस्कृती

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन

मुख्य मंत्री
महाराष्ट्र



सत्यमेव जयते

Chief Minister
Maharashtra

२३ एप्रिल २०१३

## शुभेच्छा

महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार वितरण सोहळा मुंबई येथे आयोजित केल्याचे समजून अतिशय आनंद झाला.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे चित्रपट क्षेत्रातील बदल अपेक्षित आहे. कृष्णधवल चित्रपटांच्या आरंभीच्या काळात मुकपट, बोलपट अशा चित्रपटांबरोबर आजच्या नवीन रंगीत चित्रपटातील विविध तंत्रपध्दतीमुळे संपुर्ण चित्रपट क्षेत्र उत्तुंग झेप घेत असल्याचे दिसून येते. या सर्वांचे श्रेय चित्रपट निर्मिती करणाऱ्या संस्था, त्यांच्याकडे असलेले अनुभवी कुशल तज्ञ यांना जाते. हिंदी व इंग्रजी चित्रपटातील उत्कृष्ट तंत्राची अलिकडील निर्मितीमुळे मराठी चित्रपटाची चित्रपट निर्मितीची दिशा बदलल्याचे द्योतक म्हणावे लागेल.

यावर्षीच्या महाराष्ट्र राज्य चित्रपट स्पर्धेत नवनवीन विषय व तंत्रज्ञानाने युक्त असे दर्जेदार मराठी चित्रपट पुढील आणखी दर्जेदार चित्रपट निर्माण करण्यासाठी आव्हाने पेलवतील असा मला विश्वास वाटतो.

या सुवर्ण महोत्सवी सोहळयास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

( पृथ्वीराज चव्हाण )



# उप मुख्यमंत्री

## महाराष्ट्र राज्य

दिनांक :- २५ एप्रिल २०१३

### शुभसंदेश

पन्नासाव्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाच्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार आणि पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा. भारतीय चित्रपटसृष्टी आपला शतकमहोत्सव साजरा करीत असतानाच राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचा सुवर्णमहोत्सव आपण साजरा करीत आहोत, ही आपल्या सर्वांसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

सुवर्णमहोत्सवी चित्रपट महोत्सव पारितोषिके आणि पुरस्कार प्रदान सोहळ्यात 'राज कपूर जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येत असलेले ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक श्री. बासू चॅटर्जी, 'चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येत असलेले ज्येष्ठ रंगभूषाकार श्री. पंढरीदादा जुकर, 'राज कपूर विशेष योगदान पुरस्कारा'ने सन्मानित अभिनेते श्री. नाना पाटेकर, 'चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कारा'ने सन्मानित अभिनेत्री श्रीमती रीमाताई लागू या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ रंगकर्मींचं, तसंच राज्य मराठी चित्रपट पुरस्कारविजेत्या सर्व कलावंत आणि तंत्रज्ञांचं मी मनापासून अभिनंदन करतो. ते बजावत असलेल्या मराठी चित्रपटसृष्टीच्या सेवेबद्दल त्यांचे आभार मानतो.

भारतीय चित्रपटसृष्टीची मुहुर्तमेढ स्वर्गीय दादासाहेब फाळके यांनी रोवली. त्यानंतरच्या या शंभर वर्षांच्या वाटचालीत भारतीय चित्रपटसृष्टी समृद्ध करण्यासाठी अनेक मराठी कलावंत, दिग्दर्शक, तंत्रज्ञांनी आपलं अमूल्य योगदान दिलं आहे, त्यांचं स्मरण यानिमित्ताने करणं आवश्यक आहे. हिंदी चित्रपटसृष्टीने आज जगन्मान्यता मिळवली असून मराठी चित्रपटसृष्टीही त्यादिशेने आश्वासक वाटचाल करत आहे, ही आनंदाची बाब आहे. मराठी चित्रपटसृष्टीच्या वाटचालीत राज्य शासन नेहमीच मराठी चित्रपटसृष्टीच्या सोबत असणार आहे. त्यासाठी मराठी चित्रपटांना सर्वतोपरी मदत करण्याची शासनाची भूमिका आहे. दर्जेदार मराठी चित्रपटांची निर्मिती होऊन मराठी चित्रपटांना जागतिक वैभव प्राप्त व्हावे, याकरिता शासन प्रयत्नशील आहे. या प्रयत्नांमधूनच अत्युत्तम चित्रपट तयार होतील, असा मला विश्वास आहे.

मराठी चित्रपटांनी मनोरंजनाबरोबर समाजप्रबोधन तसेच लोकजागृतीचे मोलाचे कार्य केले आहे. यापुढे मराठी चित्रपटसृष्टीने अनुकरणप्रियता टाळून नाविण्याचा ध्यास घेत स्वत:चा वेगळा ठसा उमटवण्याची गरज आहे. मराठी चित्रकर्मींच्या प्रयोगशीलतेवर आणि दर्जावर गेल्या काही वर्षांतील राष्ट्रीय पुरस्कारांमुळे शिक्कामोर्तब झाले आहे. यापुढे देखील राष्ट्रीय पुरस्कारांबरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारांमध्ये मराठी चित्रकर्मींचे नाव पाहण्याचे भाग्य आम्हा मराठी चित्रपटरसिकांना लाभेल, असा मला विश्वास आहे.

५० व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवातील पारितोषिकप्राप्त सर्व चित्रकर्मींचे, 'जीवनगौरव' आणि 'विशेष योगदान पुरस्कार' विजेत्या मान्यवर चित्रकर्मींचे मन:पूर्वक अभिनंदन. पारितोषिक वितरण समारंभास व यानिमित्त प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस माझ्या हार्दीक शुभेच्छा.

(अजित पवार)



**मंत्री**
**ग्रामविकास**
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :

## ॥ शुभसंदेश ॥

५० व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचा पारितोषिक प्रदान सोहळा येत्या २ मे, २०१३ रोजी मुंबईतील रवींद्र नाटय मंदिर येथे आयोजित करण्यात आल्याचे समजून आनंद झाला.

चित्रपट हे मनोरंजनाबरोबर समाजप्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम आहे. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात मराठी चित्रपटांना मानाचे स्थान आहे. सामाजिक आणि आशयप्रधान चित्रपट निर्मितीचा वारसा मराठी चित्रपटांनी भारतीय चित्रसृष्टीला दिला. मराठी निर्मितीसाठी राज्य शासन कर्तव्य भावनेने मदत करते. सामाजिक बांधिलकी असलेले दर्जेदार मराठी चित्रपट यापुढेही निर्माण केले जातील, अशी मला आशा वाटते.

पारितोषिक प्राप्त चित्रपट कलावंत, तंत्रज्ञ, निर्माते आणि दिग्दर्शकांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

परितोषिक वितरण समारंभास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**(जयंत पाटील)**

मंत्री
महाराष्ट्र राज्य



मंत्री
पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक :

# शुभसंदेश

भारतीय चित्रपट सृष्टीचे शतक महोत्सवी वर्ष आणि महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असा दुर्मिळ सुयोग यंदा दि. २ मे २०१३ रोजी राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग साधणार असून त्यानिमित्ताने सुवर्ण प्रतिमा ही स्मरणिका प्रकाशित करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

महाराष्ट्रात चित्रपट व्यवसायाला राजाश्रय देणे आणि मराठी भाषेत निर्माण होणारे चित्रपट कलात्मक व तांत्रिकदृष्टया परिपूर्ण, महाराष्ट्राच्या संस्कृतिचे दर्शन घडविणारे तसेच सामाजिक, शैक्षणिक व मानवी मूल्यांची जपणूक करणारे असावेत म्हणून अशा चित्रपटांच्या निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग प्रयत्नशील आहे. मराठी चित्रपटांना करमाफी, अनुदान, पुरस्कार इ. विविध माध्यमांतून मराठी चित्रपटसृष्टी आणि संबंधित सर्व घटकांना न्याय देण्याचा आमचा प्रयत्न आहे. गतवर्षापासून चित्रपट पुरस्कारांसह सर्व पुरस्कारांच्या रक्कमेमध्येही दुपटीने वाढ करण्यात आली आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीत मराठी चित्रपट सृष्टीचे योगदान हे या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित करण्याची तसेच चित्रपटसृष्टीतील पूर्वासूरींचे स्मरण करण्याची संधी आपल्याला लाभली आहे.

या स्मरणिकेत मान्यवर कलाकार व चित्रपट अभ्यासक, समीक्षकांनी अतिशय मनापासून लेख लिहून सहकार्य केले आहे. तसेच स्मरणिकेत चित्रपट पुरस्कारांचा गेल्या ४९ वर्षांचा निकाल तसेच परिक्षकांची नावे एकत्रित बघायला मिळणार आहेत. ही स्मरणिका निश्चितच अतिशय संग्राहय ठरेल.

भारतीय चित्रपटसृष्टीच्या शंभर वर्षानिमित्त तसेच मराठी चित्रपट पुरस्कारांच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मी चित्रपट सृष्टीतील सर्व निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ व संबधित सर्व घटकांचे अभिनंदन करतो व सुयश चिंततो.

**(संजय देवतळे)**
**मंत्री, सांस्कृतिक कार्य**




राज्यमंत्री
सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क
सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, शालेय
शिक्षण, महिला व बाल विकास, सार्वजनिक
आरोग्य व कुटुंब कल्याण व अल्पसंख्याक
विकास (औकाफसह)
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*


दिनांक

## शुभ – संदेश

मराठी चित्रपटाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व कलात्मक जीवनाच्या जडणघडणीत मोलाची कामगिरी बजावलेली आहे.

चित्रपटाची मुहूर्तमेढ चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांनी रोवली त्याचे स्मरण सातत्याने शासनाने आयोजित केलेल्या चित्रपट पारितोषिक वितरणाच्या प्रसंगी होत असते.

मराठी चित्रपट महोत्सव ५० व्या वर्षात पोहोचला आहे. या चित्रपट महोत्सवाने मार्गक्रमण करीत सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे.

यावर्षीच्या चित्रपट महोत्सवातील विजेत्यांचे अभिनंदन व प्रसंगी प्रकाशित होत असलेल्या संदर्भग्रंथास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

( फौजिया खान )

महाराष्ट्र शासन
सत्यमेव जयते

दूरध्वनी- २२०२५०४२/२२०२८७६२

मुलगी वाचवा
save the girl child

जयन्त कुमार बाँठिया
मुख्य सचिव

**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ एप्रिल, २०१३.

## शुभ संदेश

५० व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन दि.२ मे २०१३ रोजी रविंद्र नाटय मंदिर, प्रभादेवी येथे आयोजित होत आहे हे ऐकून अतिशय आनंद झाला.

कल्याणकारी राज्याच्या शासन आणि प्रशासन यंत्रणेच्या यशामध्ये सांस्कृतिक क्षेत्राचे योगदान नेहमीच महत्वाचे ठरत आले आहे.

या प्रसंगी सर्व विजेत्या चित्रपटांचे निर्माते,दिग्दर्शक,लेखक,गीतकार,अभिनेते आणि तंत्रज्ञ या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि मी या चित्रपट सोहळयास सुयश चिंतितो.

२३/०४/१३

**( जयन्त कुमार बाँठिया )**
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

# ऋणनिर्देश

महासंस्कृती

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
सांस्कृतिक कार्य संचालनालय
महाराष्ट्र शासन
जुने सचिवालय, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२. ● दूरध्वनी : २२०४ ३५५०/७१, २२८४ २६७०, फॅक्स : ०२२-२२८४ २६३४

भारतीय चित्रपटसृष्टीचा शतकमहोत्सव आणि महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचा सुवर्णमहोत्सव, असा दुहेरी योग साधून एक संग्रहय अशी स्मरणिका आज मूर्त स्वरुपात येत आहे. त्यासाठी अनेकांचे बहुमोल मार्गदर्शन, सहकार्य लाभले आहे. त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो, मी माझे कर्तव्य समजतो.

या स्मरणिकेसाठी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजित पवार मुंबईचे पालकमंत्री मा.ना.श्री. जयंत पाटील, खात्याचे मंत्री मा.ना.श्री. संजय देवतळे, राज्यमंत्री मा.ना.फौजिया खान या सर्वांनी शुभेच्छा दिल्या आहेत, या सर्वांचे मी सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने मनापासून आभार मानतो. मा. देवतळे साहेबांनी केलेल्या मार्मिक सूचनांमुळे स्मरणिका अधिक माहितीपूर्ण व आकर्षक होण्यास मदत झाली. खात्याच्या प्रधान सचिव मा. श्रीमती मेधा गाडगीळ यांनी केलेल्या प्रशासकीय मार्गदर्शनामुळे स्मरणिका वेळेत पूर्ण करता आली. त्यांची मन:पूर्वक आभार.

तसेच मंत्रीमहोदयांचे खाजगी सचिव मा. अभय यावलकर यांनी स्मरणिका योग्यप्रकारे होण्यासाठी ती आस्था दाखविली त्यासाठी त्यांचेही मनापासून आभार, उपसचिव श्री. संजय भोकरे, अवर सचिव अलका पाटील, गीता कुलकर्णी या सर्वांचे सहकार्य या स्मरणिकेसाठी झाले. त्यांचेही मी मनापासून आभार मानतो.

स्मरणिकेची आखणी करताना चित्रपट सृष्टीशी अनेक वर्षे तज्ज्ञ, अभ्यासक, पत्रकार इ. भूमिकांनी निगडित असलेले सर्वश्री इसाक मुजावर व सुधीर नांदगांवकर या जेष्ठांच्या सल्लागार मंडळाने केलेल्या अतिशय नेमक्या सूचना आणि मार्गदर्शन फारच मोलाचे ठरले. तसेच संपादक मंडळातही चित्रपट क्षेत्रातील जाणकार लेखक-पत्रकार अशोक राणे, ललिता ताम्हणे, दिलिप ठाकूर व शीतल करदेकर या

अतिशय परिश्रमपूर्वक लेख, मुलाखती, छायाचित्रे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्पर्धेचा गेल्या ४९ वर्षाचा निकाल. परिक्षकांची नामावली इ. सर्व बाबी अचूक व परिपूर्ण करण्याच्या दृष्टीने परिश्रम घेतले आहेत. अर्थात, स्पर्धेचा निकाल, परिक्षकांची नामावली इ. बाबी उपलब्ध अभिलेखावरूनच घेण्यात आल्या आहेत.

भारतीय चित्रपटसृष्टीची शताब्दी आणि राज्य शासनाच्या पुरस्काराचा सुवर्णमहोत्सव साजरा होत असताना हा संपूर्ण कालखंड अनुभवलेल्या व्यक्तींचा समावेश यात असावा. या कल्पनेतून बुजुर्ग अभिनेत्री सुलोचना दीदी, जगदविख्यात गायिका आशा भोसले, ज्येष्ठ अभिनेत्री सीमा देव, जेष्ठ दिग्दर्शक राजदत्त ही काही प्रातिनिधिक नावे चर्चेतून पुढे आली. त्यापैकी सुलोचना दीदी आणि राजदत्त यांना शब्दबद्ध करण्याची जबाबदारी शीतल करदेकर ह्यांनी घेतली तर आशा भोसले आणि सीमा देव यांच्या लेखांची जबाबदारी ललिता ताम्हणे यांनी घेतली व उत्तम प्रकारे पार पाडली. या चार महान कलाकारांमुळे स्मरणिकेला 'चार चाँद' लागले, अशी आमची भावना आहपे. आम्ही त्यांच्या ऋणात राहू इच्छितो.

याबरोबरच, श्री. सुधीर नांदगांवकर (महोत्सवातून उत्साहाची संजिवनी लाभली), श्री. सतीश रणदिवे (राज्य पुरस्काराचे श्रेष्ठत्व निर्विकार), श्री. परेश मोकाशी (हलत्या चित्रांचा विजय असो), श्री. दिलिप ठाकूर (मी. रंगभवन, धोबीतलाव) श्री. संतोष पाठारे ('श्वास'नंतरचा मराठी सिनेमा), श्री. अशोक राणे (मराठी चित्रपटसृष्टी एक मुक्त चिंतन), श्री. प्रसाद सुर्वे, अध्यक्ष अखिल भारतीय चित्रपट महामंडळ (शासनाच्या योजनेमुळे चित्रपटसृष्टीची प्रगती), रेखा देशपांडे (भारतीय सिनेमाचे सर्वात राजस स्वप्न) या सर्व माहितीपूर्ण लेखांबद्दल मी उपरोक्त सर्व लेखकांचे मनापासून आभार मानतो.

स्मरणिकेची मांडणी व सजावट अतिशय देखणेपणाने केल्याबद्दल श्री. रघुवीर कुल यांचे, तसेच मुख्यपृष्ठावरील सुवर्ण मानचिन्हासाठी श्री. विभाष सोनावणे, आतील मानचिन्ह छायाचित्रांसाठी श्री. रुद्रमणी कांबळे, आशा भोसले यांची अप्रकाशित छायाचित्रे उपलब्ध करून दिल्याबद्दल दिवंगत गौतम राजाध्यक्ष यांच्या सहकार्यांचे, त्याचबरोबर विनय नेवाळकर, प्रसाद महाडकर, निर्मिती ग्राफिक्सचे आनंद खासबागदार, योगेश यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल तसेच कमीत-कमी वेळत उत्तम छपाई केल्याबद्दल रचना मुद्रणचे श्री. सुरेश भिमाजी तिकोने व त्यांचे सर्व सहकारी यांचेही आम्ही अत्यंत आभारी आहोत. अतिशय कमीतकमी वेळात संग्राह्य अशी स्मरणिका काढताना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ज्या सर्वांचे सहकार्य लाभले, त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

स्मरणिका अधिकाधिक देखणी, परिपूर्ण, माहितीपूर्ण व रंजक करण्याचा आमचा प्रयत्न होता. हा प्रयत्न चित्रपट रसिकांना, अभ्यासकांना निश्चितच आवडेल असा मला विश्वास वाटतो.

**(आशुतोश भा. घोरपडे)**
**संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय**

# संपादकीय

महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे म्हणजेच पर्यायाने राज्य चित्रपट पुरस्काराचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष! विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे या घटनेला एक खास औचित्य आहे आणि ते म्हणजे हे भारतीय चित्रपटसृष्टीचे शतक महोत्सवी वर्ष आहे! गेल्या पन्नास वर्षात या महोत्सवाच्या व्यासपीठावरून, मराठी चित्रपटाला भरघोस योगदान देणाऱ्या असंख्य सर्जनशील कलावंतांना दिग्दर्शक, निर्माते, कलाकार, लेखक, गीतकार, संगीतकार, छायाचित्रकार, संकलक, ध्वनिलेखक, कला दिग्दर्शक, वेशभूषाकार, रंगभूषाकार, नृत्यदिग्दर्शक, जाहिरात डिझायनर आदि तंत्रज्ञांना-पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांना शासकीय दरबारात मराठी मनाचा मानाचा मुजरा करण्यात आला. यात जवळपास पाच पिढ्यांच्या कलावंतांचा समावेश आहे. यानिमित्ताने या पुरस्कारांमार्फत आद्य पिढीशी नवीन पिढीची सहजपणे नाळ जोडली गेली आहे. कालपरवा जो सन्मान अमुक एका ज्येष्ठाला प्राप्त झाला त्यावर आज आपले नाव कोरले गेले आहे ही सुखद भावना तरुण कलावंतांच्या मनाशी आहे. केवळ अशाप्रकारे ज्येष्ठांच्या पंक्तीला जाऊन बसणे एवढ्यापुरताच हा अनुभव मर्यादित नाही, तर डॉ. व्ही. शांताराम, बाबुराव पेंढारकर, भालजी पेंढारकर, मा. विनायक, ग. दि. माडगूळकर, साहेबमामा फत्तेलाल, गजानन जहागीरदार, आचार्य अत्रे, चिंतामणराव कोल्हटकर, शिवाजी गणेशन, राज कपूर आदी ऋषितुल्य चित्रकर्मींच्या नावाचा पुरस्कार घेताना त्या त्या कलावंताच्या मनाशी एकप्रकारची पावन झाल्याची भावना आहे. मराठी चित्रपटसृष्टीला ललामभूत ठरलेल्या या ज्येष्ठांच्या नावाने हे पुरस्कार सुरू करताना महाराष्ट्र शासनाने आणि शासनाकडे तसा आग्रह धरणाऱ्या मराठी चित्रपटसृष्टीने या दिग्गजांचे केवळ स्मरण जागे ठेवले नाही, तर त्यांनी सुरू करून दिलेल्या परंपरेशी अवघ्या चित्रपटसृष्टीला कायमचे जोडून घेतले. पूर्वसूरींना केलेले हे अभिवादन अपूर्व तितकेच अनोखे आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांच्या जन्मदिनी म्हणजे ३० एप्रिल रोजी हा पुरस्कार सोहळा दरवर्षी साजरा करून महाराष्ट्र शासन आणि अवघी चित्रपटसृष्टी त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करीत असते.

मराठी चित्रपटांना आणि प्रमुख कलाकार, तंत्रज्ञांना देण्यात येणाऱ्या या पुरस्कारांची संख्या उत्तरोत्तर

वाढवतच नेत अन्य सहाय्यक कलाकार तसेच तंत्रज्ञांना त्यात सामावून घेण्यात आले. इतकेच नव्हे मराठी-बरोबरच हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ कलावंतांना जीवनगौरव पुरस्कार देऊन महाराष्ट्र शासनाने मराठी मातीत जन्मलेल्या, वाढलेल्या हिंदी चित्रपसृष्टीचाही गौरव केला. एकाच व्यासपीठावर मराठीतील ज्येष्ठ तसेच नवोदित कलावंतांबरोबर हिंदीतील बुजुर्गांचा सत्कार सोहळा घडवून आणणे हे खचितच मराठी मातीच्या कलासक्त जाणिवांचे प्रतिक आहे. मऱ्हाटभूमीला असलेल्या कलावंताच्या कोडकौतुकाचे ते आगळे तितकेच विलक्षण दर्शन आहे.

याचबरोबर, मराठी चित्रपटांनी, कलावंतांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजवलेल्या पराक्रमांची विशेष नोंद घेत महाराष्ट्र शासन राज्य मराठी चित्रपट महोत्सवाच्या व्यासपीठावर त्यांचा यथोचित गौरव करत असते.

महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन सुरुवातीला रंगभवनमध्ये होत असे. त्याला जोडूनच सात दिवसांचा चित्रपट महोत्सव आयोजित करून त्या त्या वर्षीचे सात सर्वश्रेष्ठ चित्रपट त्यात विनामूल्य दाखविले जात. मराठी चित्रपटात गौरवास्पद असे जे काही घडते आहे ते प्रेक्षकांपर्यंत नेण्याचा हा शासनाचा कौतुकास्पद उपक्रम होता. उत्तरोत्तर महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे स्वरूप बदलत गेले. केवळ मुंबईपुरताच सीमित राहिलेला हा सोहळा शासनाने महाराष्ट्रात सर्वदूर नेला. साध्या, सहज घरगुती स्वरुपातील या सोहळ्याला काळाची पावले ओळखत ऑस्करच्या धर्तीवर साजरा करण्यास सुरुवात करून तो भव्यदिव्य केला. पुरस्कारांची रक्कम वेळोवेळी वाढवत नेली. सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून हिंदीबरोबरच इतर भाषिक चित्रपटसृष्टीतील मान्यवरांना पाचारण करण्यात आले. परिणामी मराठी चित्रपटांची गौरवगाथा आणि त्यातील महाराष्ट्र शासनाचा सहभाग याची चर्चा देशभर गेली.

पुरस्कार प्राप्त कलावंतांच्या कायम स्मरणात राहणारा आणि त्यांना तसेच इतरांना ही उभारी देणारा हा चित्रपट पुरस्कार महोत्सव गेली एकोणपन्नास वर्षे सातत्याने आयोजित करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातले बहुधा एकमेव राज्य असावे.

महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे संपूर्ण आयोजन शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचलनालयामार्फत केले जाते. अर्थातच त्यासाठी संचालनालयाला मराठी चित्रपटसृष्टीची आणि प्रसारमाध्यमांची बहुमोल मदत होत आली आहे.

आजच्या या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याच्या निमित्ताने 'सुवर्ण प्रतिमा'मध्ये राज्य चित्रपट पुरस्काराच्या गेल्या पन्नास वर्षाच्या वाटचालीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रदीर्घ काळात केवळ या पुरस्काराच्या अवकाशात घडलेल्या साऱ्या घडामोडी एका ठिकाणी आणि उपलब्ध असलेल्या वेळात मांडणे हे तसे अशक्य नसले तरी अवघड काम होते. परंतु संचालनालयाचे संचालक आशुतोष घोरपडे, सह-संचालक श्रीमती मीनल जोगळेकर, अधीक्षक श्री. रमेश पांचाळ आणि त्यांचे इतर सहकारी यांनी केलेल्या अथक सहकार्यामुळेच ते शक्य झाले. पन्नास वर्षातील पुरस्कारांची सविस्तर यादी, इतर मान-सन्मानांची नोंद आणि शासकीय कार्यालयातील छायाचित्रे हा महत्त्वाचा ऐवज त्यांनी ज्या तत्परतेने उपलब्ध करून दिला त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार!

मराठी चित्रपटांचा, त्यातील तमाम कलावंत-तंत्रज्ञांच्या कलागुणांचा पुरस्कार देऊन शासकीय पातळीवर गौरव करण्यात पुढाकार घेणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या, या उपक्रमात मनोभावे सहभागी झालेल्या अवघ्या चित्रपटसृष्टीच्या, माध्यमांच्या आणि मराठी चित्रपटावर भरभरून प्रेम करणाऱ्या प्रेक्षकाच्या मनात या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने एकच भावना आहे आणि ती म्हणजे केवळ राज्य पातळीवरच नव्हे तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मराठी चित्रपटाची पताका सदा सर्वकाळ फडकत राहू दे!

# लेख

महासंस्कृती

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन

# हलत्या चित्रांचा विजय असो!

परेश मोकाशी

आपल्या देशात क्रिकेटला हरवू शकणारी एकच गोष्ट. चित्रपट! १९११ साली आपल्या छोट्या मुलांबरोबर गिरगावच्या रस्त्यावर भटकणाऱ्या अफाट धुंडीराजने एका तंबूत उत्सुकतेने प्रवेश केला आणि चित्रपट ही कला तंबूतून थेट आजच्या मल्टिप्लेक्समधे प्रस्थापित झाली आहे. आज आपण त्याला जनक बिनक म्हणतो त्या जनकत्त्वाची सुरुवात बरीच आधी झाली होती. वयाच्या सोळाव्या वर्षी बाळाचे पाय जे. जे. स्कूलमधे दिसले, तेव्हाच.



हा धुंडीराज अशाच फटकेबाज गोष्टींसाठी प्रसिद्ध. त्याची बुद्धिमत्ता पाहून कुणी धनिकाने त्याला स्टिल फोटोचा कॅमेरा बक्षीस दिला. त्या काळात पुढे त्याने गुजरातेतल्या गोध्रा इथे स्टुडिओ टाकला. तर, कॅमेरा माणसातले जीवन शोषून घेतो ह्या अफवेमुळे तो गुंडाळावा लागला. आता धुंडीराजच्या मदतीला आले भांडारकर. आपले संस्कृत आणि इतिहास पंडित. त्यांनी धुंडीराजला आर्कियोलोजिकल सर्व्हे ऑफ इंडियात फोटोग्राफर म्हणून चिकटवले. आता जरा बरे चालले होते तोच १९०५ ला वंगभंगाच्या चळवळीत त्याने सरकारी नोकरी सोडली. आता राजा रविवर्मा. त्यांच्या स्टुडियोत प्रिंटिंग शिकला. लगेच मुंबईला एका मथुरादासाबरोबर भागीदारीत धंदा सुरू झाला. लगेच राजीनामाही दिला. लगेच पैसेही संपत चालले. लगेच चित्रपट काढायचेही ठरले. मागे एकदा

कॅमेऱ्याने चटका दिला असूनही पुढे परत त्याच वाटेला! हा सगळा घटनाक्रम पाहिला की त्यांच्या सिनेमा खटपटीचे विशेष कौतुक वाटते. हेही पटते की हाच माणूस हे करू शकत होता.

धुंडीराज हे करू शकला ह्याला कारण तो स्वत: जितका होता तेवढीच त्याची बायको सरस्वती होती. दोन मुले, बेकार नवरा आणि संपत चाललेली संपत्ती ह्या नेहमीच्या मराठी कलाकारांबरोबर तिनेही ह्या प्रकारात उडी घेतली.

चित्रपटासाठी दागिने किंवा इतर काहीही गहाण टाकण्याची कला तिने शोधून काढली. पुढे अनेक जण ह्या कलेत पारंगत झाले. एका वेळी चाळीस चाळीस लोकांसाठी अन्न शिजवणे, तीन मुले सांभाळणे, कॅमेरा-डेव्हलपिंग-प्रिंटिंग शिकून वर धोतरांचे रिफ्लेक्टर धरायला तयार असणे ही कामांची यादी येरीगबाळीची नव्हे आणि म्हणूनच, दादासाहेब फाळके पुरस्काराचे नाव खरेतर 'दादासाहेब-सरस्वती' पुरस्कार असायला हवे असे आमचे मत आहे ते काही उगीच नव्हे!



फाळकेंच्या आणि चित्रपट शंभरीच्या निमित्ताने आणखी काही अरभाट माणसांचे स्मरण झाल्यास योग्य. फाळकेंच्या आधी एका नाटकाचे व्यवस्थित चित्रीकरण करून ते प्रदर्शित करण्याचे धाडस करणारे दादासाहेब तोरणे हे असेच एक लढवय्ये. कोकणातून मुंबईत आलेला हा उमेदवार मुलगा पुढे चांगलाच नामवंत निर्माता दिग्दर्शक झाला. ग्रीव्हज कॉटन कंपनीत इलेक्ट्रिकल डिपार्टमेंटमधे नोकरी करता करता हा इसम चित्रपटाकडे कसा वळला ह्याचे खूप



तपशील नाहीत. पण एका नाटकाचा खेळ आयोजित करून तो कॅमेऱ्याने शूट करणे हा प्रयोग सुचणेही महत्त्वाचे. कॉरोनेशन थिएटरचे मालक चित्रे व टिपणीस ही अशीच एक दुक्कल. त्यांच्याही पूर्वी सेन व सरकार ही बंगाली जोडी ह्या क्षेत्रात प्रयत्न करत होती. मात्र सर्वात आद्य उद्योगी ही उपाधी जाते सावेदादा उर्फ हरिश्चंद्र सखाराम भाटवडेकर ह्यांच्याकडे. ल्यूमिये बंधूंनी १८९५ साली जगातला पहिला चित्रपट केला. तो लगेचच पुढच्या वर्षी भारतात दाखवण्यात आला. ते पाहून भारतीय चित्रपटांतला हा पहिला हरिश्चंद्र चकित झाला. त्यांनी ल्यूमिये बंधूंच्या त्या वस्तूंची एजन्सीच घेतली. कॅमेरा नावाचे कोलित ह्या हरिश्चंद्राच्या हातात आले. १८९८ सालीच त्यांनी कधी मिरवणूक शूट कर, कधी कुस्ती तर कधी डोंबाऱ्याचे खेळ असा सपाटा लावला. केवळ शूट करून ते थांबले नाहीत. ते ५,१०,१५ मिनिटांचे चित्रपट त्यांनी थिएटरमधे लावले आणि ते चाललेही!

मात्र ह्या एकापेक्षा एक माणसांमधून फाळके वेगळे ठरतात ते त्यांच्या कल्पकतेमुळे. मुळात कॅमेरा ह्या वस्तूची किंवा चित्रपट माध्यमाची शक्ती, सौंदर्य कशात आहे हे त्यांनी अचूक जाणले. वेगवेगळ्या स्थळी जाऊन प्रसंग चित्रित करून ते एका टेबलावर संकलित करून त्यातून चित्रपट तयार करणे हा प्रकार त्यांनी नीट आत्मसात केला. शिवाय पडद्यावरून माणसे अदृश्य करणे, प्रकट करणे, मुंडके धडावेगळे करणे, एकातून अनेक जण निर्माण करणे असे अनेक अचाट ट्रिक सीन्स त्यांनी केले; कॉम्प्युटर अनेक वर्ष दूर असताना. चित्रपट शिकवण्याची-शिकण्याची गरज आहे हा विचार त्यांनी जगात पहिल्यांदा मांडला. चित्रपट आणि बोलपट ह्यात फरक आहे आणि बोलपटापेक्षा चित्रपट श्रेष्ठ हा त्यांचा विचार आजही महत्त्वाचा. चित्रपटाने शतक ठोकले. आता पुढे द्विशतक. सामना जिंकू की नाही माहीत नाही. पण आम्ही आज टीममध्ये आहोत ह्याचा आनंद जास्त आहे.

१९६२ साली झालेल्या पहिल्या महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात, सुधीर फडके यांना 'प्रपंच' चित्रपटासाठी उत्कृष्ट संगीतकाराचे पारितोषिक मिळाले. १९६९ साली सहाव्या चित्रपट महोत्सवात त्यांना 'संथ वाहते कृष्णामाई' चित्रपटासाठी उत्कृष्ट पार्श्वगायकाचा पुरस्कार मिळाला. १९७० साली सातव्या चित्रपट महोत्सवात 'आम्ही जातो आमच्या गावा' चित्रपटासाठी त्यांना उत्कृष्ट संगीतकार आणि उत्कृष्ट पार्श्वगायक, असे दोन्ही पुरस्कार प्राप्त झाले. त्यानंतर १९७२ साली नवव्या चित्रपट महोत्सवात 'धाकटी बहीण'साठी, १९७५ साली बाराव्या चित्रपट महोत्सवात 'कार्तिकी'साठी तर १९७७ साली चौदाव्या चित्रपट महोत्सवात 'या सुखांनो या' चित्रपटासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचे पुरस्कार लाभले. म्हणजेच, सर्वोत्कृष्ट संगीतकार म्हणजे सुधीर फडके यांना दोन वेळा पुरस्कार लाभले, तर सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक म्हणून पाच वेळा पुरस्कार प्राप्त झाले.

# भारतीय सिनेमाच्या इतिहासातील मानदंड!

रेखा देशपांडे



भारतीय चित्रपट उद्योग उभारणारे दादासाहेब फाळके यांच्या द्रष्टेपणाचे सर्वार्थाने पहिले वारस व्ही. शांताराम हे होत. वयाच्या बाराव्या वर्षी बाबूराव पेंटर यांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीत हरकाम्या म्हणून ते जे रुजू झाले ते, या दिसामासाने वाढत, विकसित होत चाललेल्या माध्यमाच्या अंगांगांचा बारकाईने परिचय करून घेत, हरएक तंत्राचा, हरएक कलाप्रकाराचा अभ्यास करीत निघाले. उपजत कलागुण, बुद्धिमत्ता, जिज्ञासा आणि मेहनत यांच्या जोरावर व्ही. शांताराम यांनी वेगाने दिग्दर्शनापर्यंतचा पल्ला गाठला.

दामले, फत्तेलाल, धायबर आणि सीतारामपंत कुलकर्णी या सोबत्यांबरोबर लवकरच त्यांनी प्रभात कंपनीची स्थापना केली. सिनेमा हाच त्यांचा ध्यास होता. देशात इतरत्रही विकसित होत चाललेल्या सिनेमाविषयक प्रयत्नांकडे शांताराम यांचे बारकाईने लक्ष होते, तसेच विदेशांतील सिनेमाविषयक घडामोडींकडेही लक्ष होते. 'आलमआरा' हा भारताचा पहिला बोलपट प्रदर्शित होताच, नव्या युगाची चाहूल ओळखून प्रभातने बोलपटाच्या निर्मितीची तत्परता दाखविली आणि मराठीतला पहिला बोलपट 'अयोध्येचा राजा' पडद्यावर अवतरला. दिग्दर्शक होते व्ही. शांताराम. १९२९ साली सुरू झालेली 'प्रभात कंपनी' ही भारतातील अग्रणी चित्रपटसंस्थांपैकी एक म्हणून ओळखली गेली त्यामागे शांताराम यांचे

व्यवसायविषयक द्रष्टेपण, प्रयोगशीलता, त्यासाठी लागणारे व्यावसायिक धाडस, सामाजिक भान, मनोरंजनाच्या उच्च मूल्यांचा ध्यास आणि अर्थातच कलावंताची कल्पकता होती.

भारतीय सिनेमाचा जन्म होऊन जेमतेम दीड दशक लोटले असताना आणि बोलपटाची नुकती नुकती सुरुवातच झालेली असताना शांताराम यांनी पारंपारिक पौराणिक कथनकांकडून प्रेक्षकांना लीलया तत्कालीन सामाजिक समस्यांकडे वळविले. 'माणूस', 'कुंकू', 'शेजारी' सारख्या चित्रपटाच्या माध्यमातून समाजाला त्या समस्यांचा विचार करायला लावले आणि सिनेमा हे केवळ मनोरंजनाचे सवंग साधन नाही, तर प्रबोधनाचे आणि समाजमनाला प्रगल्भ करू शकणारे समर्थ माध्यम आहे याचा भारतातील पहिला साक्षात्कारच त्यांनी घडविला. सुसंस्कृतता, शिस्त आणि दर्जेदार कलानिर्मिती यांसाठी प्रभात कंपनीची ख्याती निर्माण झाली आणि प्रेक्षकांमध्ये तिच्या विषयी आदरयुक्त कुतूहल निर्माण झाले, त्यामागे शांताराम यांचा सिनेमाविषयक सर्वांगीण विचार होता. किंबहुना, प्रभातच्या सर्व भागीदारांच्या योगदानाचा आदर राखून हे सांगावेच लागेल की जनतेच्या - प्रेक्षकांच्या-मनात 'प्रभात म्हणजे व्ही. शांताराम' असे समीकरणच तयार झाले आणि त्या समीकरणाने इतिहासात आपला ठसा कायमचा उमटविला.

प्रभातमधून शांताराम यांचा मोठा शिष्यवर्ग तयार झाला आणि त्याने पुढे मराठी चित्रपटसृष्टीची धुरा वाहिली. त्यात दिग्दर्शक होते, कलावंत होते, संकलक होते, तंत्रज्ञ होते. प्रभातमधून बाहेर पडल्यानंतर शांताराम यांनी नवे आव्हान स्वीकारले आणि मुंबईत आपली 'राजकमल कलामंदिर' ही चित्रपटसंस्था सुरू केली. परंतु चित्रपट-निर्मिती सुरू करण्यापूर्वी त्यांनी आपली स्वतःची वितरण संस्था सुरू करून आपली व्यवसायकुशलता पुन्हा एकदा सिद्ध केली. काळाची आणि व्यवसायाची गती ओळखून त्यांनी राजकमलमधून प्रथम हिंदी चित्रपट-निर्मिती सुरू केली.

व्यावसायिक दूरदृष्टी दाखविणाऱ्या शांताराम यांनी आशयाबाबत कधी तडजोड केली नाही. सामाजिक उद्देशपूर्ण चित्रपट ही त्यांची ओळख कायम राहिली. संस्कारांचा पाठपुरावा त्यांनी चित्रपट माध्यमातून सतत केला. त्याबरोबरच विविध कलांचा संस्कार हे त्यांच्या चित्रपटांचे आणखी एक वैशिष्ट्य ठरले. 'अमर भूपाळी', 'रामजोशी', 'झनक झनक पायल बाजे', 'नवरंग' ही याचीच उदाहरणे, तर मानवी मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या व्यवस्थेची आस हा त्यांच्या चित्रपटातील संकल्पनांचा आणखी एक विशेष. 'दो आँखें बारह हाथ', 'डॉ. कोटणीस की अमर कहानी' हे चित्रपट त्याची साक्ष देतातच, निर्मात-दिग्दर्शक म्हणून शांताराम यांच्या व्यावसायिक धाडसाची आणि मूल्याग्रहाचीही ग्वाही देतात. प्रस्थापित तारे-तारकांऐवजी नवे कलावंत घडवीत त्यांनी चित्रपटसृष्टीला आणखी एक मोलाचे योगदान दिले.

हिंदी चित्रपटांनी मराठी चित्रपसृष्टीला झाकोळून टाकलेले असताना शांताराम यांच्या 'पिंजरा'ने मराठी चित्रपटसृष्टीला नवा उत्साह, नवी आशा दिली. प्रायोगिक रंगभूमीवरील डॉ. श्रीराम लागूंसारख्या अभिनेत्याला सिनेमाच्या क्षेत्रात आणले ते शांताराम यांनी.

हिंदी चित्रपटसृष्टीने निर्माण केलेल्या स्पर्धेला तोंड देताना हतबल झालेल्या मराठी चित्रपटसृष्टीचे त्यांनी सर्वार्थाने नेतृत्व केले. १९६६ मध्ये मराठी चित्रपट महामंडळ स्थापन झाले, १९६७ मध्ये महामंडळाची घटना तयार झाली, तेव्हा महामंडळाचे पहिले अध्यक्ष बनले व्ही. शांताराम. मराठी चित्रपटसृष्टी आणि महाराष्ट्र शासनाच्या सौहार्दाचा अध्याय सुरू झाला तो व्ही. शांताराम यांच्या नेतृत्वात.

व्ही. शांताराम या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचे ऋण मराठीच नव्हे तर राज कपूरपासून यश चोपडांपर्यंत हिंदी चित्रपटसृष्टीतील अग्रगण्य व्यक्तिमत्वे मानत आली आहेत. 'व्ही. शांताराम' हा चित्रपट-कलेच्या इतिहासातील एक मानदंड आहे !

# भारतीय सिनेमाचे सर्वात राजस स्वप्न

रेखा देशपांडे

'आय ड्रीम सिनेमा, आय लिव्ह सिनेमा, आय ब्रीद सिनेमा... मी सिनेमाची स्वप्नं पाहतो, मी सिनेमा जगतो, सिनेमा हा माझा श्वास आहे' - हे राज कपूर यांचे शब्द म्हणजे त्यांच्या कारकीर्दीचेच नव्हे, तर त्यांच्या अवघ्या जीविताचे, अस्तित्वाचे वर्णन होय. वेगळ्या शब्दांत म्हणायचे तर राज कपूर म्हणजे भारतीय सिनेमाचे सत्यात अवतरलेले सर्वात राजस स्वप्न होय.

राज कपूर काय नव्हते? अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक, संकलन...संगीताची, वादनाची इतकी जाण असलेला दिग्दर्शक की मनात आणता तर संगीतकार होऊ शकला असता. सिनेमा माध्यमाचा अधिकाधिक बोलका ('बोलका' म्हणजे वाचाळ नव्हे!) वापर कसा करता येईल याचे उत्कृष्ट भान असलेला दिग्दर्शक, प्रेक्षकाच्या हृदयाला हात घालतात ते गाण्याचे भावसंपन्न,पण अगदी साधे साधे शब्द हे ओळखणारा गुणग्राही!

पृथ्वीराज कपूर यांच्याकडून जन्मजात कलेचा वारसा मिळालेल्या त्यांच्या या थोरल्या पुत्राने सिनेमाचा ध्यास घेतला, दिग्दर्शक केदार शर्मांकडे क्लॅपर बॉय म्हणून सुरुवात केली आणि भव्य स्वप्ने पाहिली...सिनेमाची भव्य, सुंदर स्वप्ने पाहिली आणि आपल्या उपजत प्रतिभेला, मेहनतीची, स्वयंशिक्षणाची विलक्षण जोड देऊन ती खरी केली. चित्रपट-



निर्मितीच्या कलेचे आणि तंत्राचे सारे पैलू-कथा-पटकथेची जाण, चित्रचौकटीच्या सौंदर्याचे नेमके आकलन, अभिनय, संगीत आणि चांगल्या काव्याची जाण आणि त्यासाठी उत्तमोत्तम कलावंत, तंत्रज्ञ, विचारवंत, कवी-गीतकार, संगीतकार-वादक यांचा लोकसंग्रह करण्याची हातोटी, या सर्वांना हाताशी घेऊन कलाकृती निर्माण करण्याचे दिग्दर्शकीय कौशल्य आणि निर्मात्याला लागणारे धाडस, दुर्दम्य आशावाद, प्रेक्षकाची नेमकी नस ओळखण्याचे कसब-म्हणजे राज कपूर यांच्या व्यक्तिमत्त्वाची अंगेच होती.

अवघ्या विसाव्या वर्षी या स्वप्नाळू तरुणाने 'आर. के. प्रॉडक्शन्स' या आपल्या चित्रपटसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली आणि आर. के. प्रॉडक्शन्सने इतिहास घडविला... स्वातंत्र्योत्तर भारताला पं. नेहरूंनी दिलेल्या नव्या समाजवादी समाजाच्या स्वप्नाला रुपेरी पडद्यावर साकार करीत सामान्यांपुढे दृश्य स्वरूपात आणले ते राज कपूर यांनी. 'आवारा', 'श्री ४२०', 'जागते रहो', 'जिस देश में गंगा बहती है' अशा चित्रपटांतून हे स्वप्न साकारताना त्यांनी सामान्यांना आशावाद दिला.

शाळेच्या रंगमंचावर या मुलाने क्रूसावरच्या कारुण्यमूर्ती ख्रिस्तालाही हसवले होते! चार्ली चॅपलिनच्या विनोद आणि कारुण्याशी राज कपूर यांचे नाते न जुळते तरच नवल! प्रामाणिक, भाबड्या, गरीब सामान्य तरुणाची व्यक्तिरेखा साकारत राज कपूर यांनी सामान्य प्रेक्षकांच्या आशा-आकांक्षांशी, वेदना-संवेदनांशी नाते निर्माण केले! संगीत, प्रेमकथा ही भारतीय हिंदी चित्रपटाची खास वैशिष्ट्ये. राज कपूर यांनी भारतीय चित्रपटातील प्रेमभावनेच्या आविष्काराला धाडसी आणि उत्कट परिमाण दिले आणि तिथून भारतीय सिनेमा बदललाच - तारुण्याने सळसळू लागला. पिढी बदलली तेव्हा नव्या पिढीच्या कोवळ्या प्रेमभावनेचाही आविष्कार त्यांच्या 'बॉबी'ने समर्थपणे केला. 'बॉबी' हा मग कोवळ्या प्रेमाचा आदर्शच बनला!

चित्रपटसंगीताच्या दृश्यानुवादातही राज कपूर यांनी आपली मोहोर उठवीत गीताच्या चित्रीकरणाचे आदर्श घालून दिले. त्यांनी शैलेंद्र-हसरत जयपुरी-शंकर-जयकिशनसारखे कलावंत चित्रपटसृष्टीला दिले. 'मेरा जूता है जापानी, ये पतलून इंग्लिस्तानी, सर पे लाल टोपी रूसी, फिर भी दिल है हिंदुस्तानी' असे गात बागडत निघालेल्या राज कपूरची दिग्दर्शकीय दृष्टी खरोखरीच खूप व्यापक होती. त्यांच्या ख्यातीने आणि चित्रपट-निर्मितीनेही भारताच्या सीमा ओलांडून जगाला गवसणी घातली. दूरचित्रवाणी, इंटरनेट अशी संपर्कसाधने नव्हती त्या काळात राज कपूरचे चाहते रशिया आणि पूर्व युरोपमध्ये निर्माण झाले होते आणि पिढ्यानपिढ्या हा चाहता वर्ग राज कपूरच्या रंगात रंगत राहिला. आजही रशिया आणि पूर्व युरोपीय देशात साठीच्या घरात पोहोचलेले राज कपूरचे दिवाणे भेटतील. 'संगम'च्या निमित्ताने विदेशात चित्रीकरण करणारा पहिला निर्माता म्हणजे राज कपूर. 'भारतीय चित्रपटसृष्टीचा शोमन' हे बिरुद चित्रपटसृष्टीने राज कपूर यांना साभिमान बहाल केले. या सौंदर्यपूजकाने सिनेमाच्या पडद्यावर रूप-रंगाच्या, संगीताच्या श्रीमंती सौंदर्याची उधळण तर केलीच, परंतु आशय आणि भावसौंदर्याचेही नेमके भान सिनेमा-निर्मितीत उतरणाऱ्या पुढच्या पिढ्यांना शिकवले.

दादासाहेब फाळके पुरस्काराच्या सन्मान सोहळ्याने या सिनेमाधर्मीच्या जीवनाची सांगता झाली तेव्हा पुन्हा एकदा त्याचे 'आय लिव्ह सिनेमा, आय ब्रीद सिनेमा..' हे शब्दच जणू प्रतिध्वनित झाले. 'कल खेल में हम हों न हों, गर्दिश में तारे रहेंगे सदा, भूलेंगे वो, भूलोगे तुम, पर हम तुम्हारे रहेंगे सदा' हा वादा आपल्या प्रेक्षकांशी करण्याइतका आत्मविश्वास राज कपूरसारख्या कलावंतातच सापडतो.

# महोत्सवातून उत्साहाची संजीवनी लाभली

सुधीर नांदगांवकर

पन्नास वर्ष पहाता पहाता उलटली! १९६२ चा पहिला चित्रपट पारितोषिक वितरण सोहळा जसाच्या तसा माझ्या डोळ्यासमोर येतोय. सोहळ्याची फ्रेम न फ्रेम लख्खपणे दिसते आहे. 'दै. मराठा'चा चित्रपट समीक्षक म्हणून या पहिल्या सोहळ्याला मी उपस्थित होतो. लिबर्टी सिनेमात हा पहिला भावपूर्ण चित्रपट पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. सिनेमाचे भीष्माचार्य शांताराम बापूंच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

प्रपंच - दिग्द. मधुकर पाठक
सुवासिनी - दिग्द. राजा परांजपे
शाहीर परशुराम - दिग्द. अनंत माने

असे एक दोन तीन क्रमांकावर चित्रपट होते. विशेष म्हणजे या तीनही चित्रपटांचे कथा-पटकथा-संवाद-गीते ग. दि. माडगूळकरांची होती.

पारितोषिक विजेत्यांच्या वतीने ग. दि. मा. समारंभात बोलले. 'या पहिल्या सोहळ्याला व्ही. शांताराम येथे उपस्थित आहेत. ही भाग्याची आणि समाधानाची गोष्ट आहे. शांतारामबापूंनी मराठी सिनेमाचा पाया घातला वगैरे...'

पारितोषिक सोहळ्यात कोणताही करमणुकीचा कार्यक्रम नव्हता. पारितोषिक वितरण आणि भाषणे असा साधाच समारंभ होता. पण तो भावपूर्ण झाला याचे कारण हिंदी सिनेमाच्या स्पर्धेने जर्जर झालेल्या

आणि आर्थिक हलाखीच्या अवस्थेत असलेल्या मराठी चित्रपटसृष्टीतील उपस्थित सर्वांचे चेहरे आनंदाने फुलले होते. महाराष्ट्र शासन मराठी सिनेमाची दखल घेत आहे, याचाच सर्वांना आनंद होत होता. दहा-दहा वर्षे चित्रपटसृष्टीत काम करूनही अनेकांचे खिसे रिकामे होते. पण शासनाने दखल घेतल्याने सर्वांचेच मन उत्साहाने भरून आले होते. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यावर शासनाने लगेचच म्हणजे साठ सालीच राज्य पुनर्रचनेचा अहवाल आल्यानंतर द्विभाषिक मुंबई राज्य स्थापन झाले आणि शासनाने नाट्यस्पर्धा आयोजित करायला सुरुवात केली. पण नाट्यस्पर्धाचे आजचे रूप १९६० नंतर सुरू झाले. त्यावेळी चित्रपटांची शासनाला आठवण झाली नाही. १९६० सालीही झाली नाही.

वास्तविक चित्रपटांना राष्ट्रीय पारितोषिके देण्याचा उपक्रम केंद्र सरकारने १९५२ साली आरंभ केला. पहिल्याच वर्षी आचार्य अत्रे लिखित-दिग्दर्शित 'श्यामची आई' ला राष्ट्रपती सुवर्णपदकाचा सन्मान मिळाला. तरीही महाराष्ट्र शासनाने पारितोषिकांसाठी दखल घेतली नाही. थोड्या उशिरा म्हणजे 'महाराष्ट्र' राज्य स्थापनेनंतर दोन वर्षांनी ती घेतली. महाराष्ट्र शासनाने चित्रपट पुरस्कार सुरू केले.

आज मागे वळून पाहताना असे लक्षात येते की नाटकांना 'कला' प्रकार म्हणून बालगंधर्वांच्या काळातच समाजाने मान्यता दिली. तशी मान्यता सिनेमाला मिळालेली नव्हती. हे एक कारण चित्रपट पारितोषिके उशिरा सुरू करण्यामागे असू शकते. शिवाय मराठी चित्रपट व्यवसाय संघटित नव्हता. सरकार दरबारी त्याची उठबस नव्हती. इथे एक घटना जरूर नोंदविली पाहिजे ती म्हणजे **१९६२ साली मराठी चित्रपटांना पारितोषिके देण्यास शासनाने आरंभ केला तेव्हा प्रादेशिक भाषेतील चित्रपट पारितोषिके सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होते. कर्नाटक, केरळ, आंध्र, तामीळनाडू यांनी त्यानंतर चित्रपटांना राज्य पारितोषिके सुरू केली.**

मराठी चित्रपटांना प्रोत्साहन देणे, त्यातील कलात्मक कलाकृतींची निर्मिती वाढीला लावणे हाच **शासनाचा** ही पारितोषिके सुरू करण्यामागे उद्देश होता. बहुश: नाट्यपारितोषिकांसारखा! तेव्हा वर्षाला



१४/१५ चित्रपट निर्माण व्हायचे.

शासनाने मराठी चित्रपटांची पारितोषिकांच्या निमित्ताने, दखल घेतल्यावर छोट्याशा मराठी चित्रपट व्यवसायात उत्साहाचे वारे खेळू लागले.

१९६२ साली चिनी आक्रमण झाले तेव्हा मृत जवानांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी केंद्र सरकारने निधी उभारायचे ठरविले. त्यासाठी संगीतकार सुधीर फडके व भारतमाता सिनेमाचे मॅनेजर विनायकराव सरस्वते यांनी पुढाकार घेऊन केंद्राच्या निधीला मराठी कलावंतांनी हातभार लावावा या देशभक्तीच्या भावनेंतून मराठी कलावंतांची रजनी हा कार्यक्रम आखला.

१९६२ साली ज्या दिवशी लिबर्टी चित्रगृहात पहिला पारितोषिक वितरण सोहळा पार पडला त्याच रात्री संरक्षण निधीसाठी मराठी कलावंतांच्या रजनीचा पहिला कार्यक्रम खामगावला होता. म्हणून पारितोषिक समारंभ सकाळी ११ वा. ठेवण्यात आला. समारंभ संपल्यावर सारे कलावंत बसने खामगावला रवाना झाले.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण नाट्यप्रेमी होते. त्यांच्याकडे नाट्य व्यावसायिकांनी विनंती करून नाटकावरचा करमणूक कर रद्द करून घेतला. नाट्यसृष्टी पुन्हा उत्साहाने उभी राहिली. १९६२ सालीच आचार्य अत्रे यांचे 'तो मी नव्हेच' रंगमंचावर आले. आणि नाट्य व्यवसायाच्या भरभराटीला आरंभ झाला.

तेव्हा शासनाकडे मराठी चित्रपट व्यवसायासाठी आपण सवलती मागूया असे मराठी सिनेमावाल्यांच्या



मनात आले. साठच्या दशकात मराठी चित्रपट व्यवसाय मुंबई, पुणे, कोल्हापूर असा तीन ठिकाणी विखुरलेला होता. व्यवसायात एकी नव्हती. तेव्हा एकीची भावना वाढीला लावण्यासाठी विनायकराव सरस्वते व निर्माते वितरक एम. बी. सामंत यांनी नाटकाप्रमाणे पहिले चित्रपट सम्मेलन १९६५ साली मुंबईच्या डिसिल्व्हा हायस्कूलमधे भरविले त्याचे उद्घाटन आचार्य अत्रे ह्यांच्या हस्ते झाले. सर्व हेवेदावे, ईर्षा, स्पर्धा बाजूला ठेवून मराठी चित्रसृष्टीतले सारे व्यावसायिक त्या निमित्ताने एकत्र आले. याच सम्मेलनांत 'मराठी चित्रपट महामंडळ' स्थापनेचा ठराव झाला. कोल्हापूरला भरलेल्या दुसऱ्या चित्रपट सम्मेलनांत 'महामंडळा'ची घटना संमत झाली आणि फेब्रुवारी ६७मधे रीतसर 'महामंडळ' रजिस्टर करण्यात आले. १९६२ साली सुरू झालेल्या शासनाच्या चित्रपट पारितोषिकांमुळे निर्माण झालेल्या उत्साहातून पाचच वर्षात मराठी चित्रपट व्यवसायिकांची पहिली संघटना स्थापन झाली.

शासनाच्या पारितोषिकांमुळे पुढच्या सहा वर्षात चित्रपट निर्मितीची संख्या १४/१५ वरून २४/२५ वर गेली. याचे प्रमुख कारण म्हणजे हिंदी सिनेमात स्थिरस्थावर झालेले दिग्गज पुन्हा मराठी सिनेमा दिग्दर्शनाकडे वळले. याचा आरंभ शांतारामबापूंनी केला. १९५१ साली त्यांचा 'अमर भूपाळी' प्रकाशित झाला होता. त्यानंतर १४ वर्षांनी १९६५ साली शांतारामबापूंनी 'इये मराठीचिये नगरी' हा मराठी चित्रपट राजकमलतर्फे दिग्दर्शित केला. त्यापाठोपाठ वसंतराव जोगळेकरांनी 'शेवटचा मालुसरा' दिग्दर्शित केला. अमीया चक्रवर्तींच्या हिंदी सिनेमाचे वितरक एन. बी. कामत यांनी स्वत:ची 'चित्र साधना' ही निर्मिती संस्था स्थापन करून शांताराम आठवलेंना दिग्दर्शन देऊन 'वावटळ' निर्माण केला. हिंदीत मेहमूदबरोबर कॉमेडी रोल करणाऱ्या शुभा खोटेने मेहमूदला नायकाची भूमिका देऊन 'चिमुकला पाहुणा' दिग्दर्शित केला. तर 'दीदी' सारखे हिंदी चित्रपट काढणाऱ्या सदाशिवरावकवींनी 'अन्नपूर्णा' (१९६८) दिग्दर्शित केला. मुंबईच्या मेट्रो सिनेमात प्रकाशित झालेला हा पहिला मराठी चित्रपट. गुरुदत्तचा भाऊ आत्माराम याने 'जिव्हाळा' (१९६०) निर्माण केला. हिंदीत चरित्र भूमिका करणाऱ्या गजानन जागीरदारांनी 'दोन्ही घरचा पाहुणा' (१९७१) दिग्दर्शित केला. हिंदीतली गाजलेली नायिका वैजयंतीमाला हिने 'झेप' (१९७१) निर्माण केला. मराठी रंगभूमीवर 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने लोकप्रिय झालेले दादा कोंडके यांनी मराठी चित्रपटांकडे मोर्चा वळविला आणि 'सोंगाड्या' निर्माण केला.

राज्य मराठी चित्रपट महोत्सवाने आणि पारितोषिकांनी आणखी एक नवा पायंडा पाडला. मराठी सिनेमा जेव्हा हलाखीत होता तेव्हा हिंदीत काम करणारे मराठी कलावंत मराठी चित्रपटात भूमिका करायचे नाहीत. परंतु सुलोचनादीदी हिंदी-मराठीत भूमिका करत राहिल्या तर डॉ. लागू, स्मिता पाटील यांनी हिंदीत भूमिका मिळत असतानाही मराठीत भूमिका करणे कमीपणाचे मानले नाही. हळूहळू ही दरी कमी झाली. अमोल पालेकर, बासू चटर्जींचा, हृषिकेश मुखर्जीचा 'हिरो' म्हणून गाजत असतानाच मराठीत भूमिका करायचा. शेवटी तर त्याने 'आक्रित' दिग्दर्शित केला.राज्य चित्रपट महोत्सवातून मराठी चित्रसृष्टीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आणि मराठी चित्रपटांना संजीवनी मिळाली ही घटना मोलाची आहे.२१व्या शतकात आता मराठी चित्रपटासाठी चॅनेलचे आणि खाजगी असे ८/१० पुरस्कार सुरू झाले आहेत. या पुरस्कारांच्या भाऊगर्दीत रोख पारितोषिक देणारा फक्त महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सव आहे. त्याची प्रतिष्ठा आणखी कशी वाढेल याचा सुवर्ण महोत्सवी पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने नव्याने विचार करायला हवा.

# मी स्वत:ला भाग्यवान समजते...

सुलोचना

भारतीय चित्रपटाचे शतक आणि मराठी चित्रपट महोत्सवाची पन्नाशी हे दोन्ही मला पहायला मिळाले म्हणून स्वत:ला मी भाग्यवान समजते. चित्रपट क्षेत्रातले चढउतार आणि मराठी चित्रपटाला जागतिक पातळीवर मिळणारी मान्यता पाहताना आनंदच होतोय. पूर्वीही आपल्याकडे चित्रपटांची कथानकं सकस होती. आता तर राष्ट्रीय पातळीवर मराठी चित्रपटाचे कौतुक होतेय. यावर्षी तर अनेक पुरस्कारात मराठी चित्रपटांनी बाजी मारलीय. त्यामुळे हे सगळं एकूणच वातावरण आपल्या चित्रपटसृष्टीसाठी पोषक आणि उत्तम आहे हे सर्वप्रथम सांगायला हवंच.



आजवर अनेक पुरस्कारांनी मला सन्मानित केले गेले. राजाश्रय, लोकाश्रय दोन्हीही मला मिळाले. प्रत्येक पुरस्काराचं आणि त्याबरोबर जोडलेल्या नावाचं वैशिष्ट्य आणि ते पुरस्कार स्वीकारतानाचा आनंद वेगवेगळा असतोच असतो. राज्य शासनाने जेव्हा चित्रपटांसाठी पुरस्कार देण्याची सुरुवात केली त्याच वर्षी माझ्या 'प्रपंच' चित्रपटासाठी मला उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. व्ही. शांताराम पुरस्कार, महाराष्ट्र भूषण पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी माझा गौरव झाला.

मधुकर पाठक दिग्दर्शित 'प्रपंच' चित्रपटाला सर्वोत्तम चित्रपटाचा प्रथम पुरस्कार आणि मला

सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. तेव्हा पुरस्कार समितीचे अध्यक्ष व्ही. शांताराम होते तर दुर्गाबाई खोटे, स्नेहप्रभा प्रधान, शांता आपटे या सदस्य होत्या. त्या वर्षी 'प्रपंच'. उषा किरण यांचा 'शिकलेली बायको', जयश्री गडकरचा 'मानिनी', सीमा देवचा 'सुवासिनी' असे सगळेच स्त्रीप्रधान चित्रपट होते. तेही तितकेच महत्त्वाचे होते. त्यांनाही पुरस्कार मिळावा असे होते.

मी 'प्रपंच' चित्रपटात मेकअप केला नव्हता. त्या भूमिकेसाठी नव्या साड्या कुंभारणीला देऊन जुन्या साड्या घेतल्या होत्या. पुण्याजवळच्या पिरगुट गावात याचं शूटिंग झालं होतं. ज्या दिवशी हा निकाल जाहीर झाला तेव्हा मी राजेश खन्नाच्या 'बहारों के सपने' चित्रपटाचे शूटिंग करत होते. शूटिंग सुरू असताना एकदम सगळे फोटोग्राफर तिथे आले. मला वाटलं राजेश खन्नाचे फोटो काढायला आले असतील, पण ते सगळे माझे फोटो काढायला लागले. तेव्हा मला कळलं की मला 'प्रपंच'साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार जाहीर झालाय. त्यावेळचा आनंद अजूनही मनात आहेच. त्या पहिल्या राज्य चित्रपट पुरस्काराचं कौतुक इतकं झालं की स्क्रीन, फिल्मफेअर. या अंकाच्या मुखपृष्ठावर माझे फोटो छापून आले.

हा पहिला पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम मुंबईच्या लिबर्टीत झाला. 'प्रपंच'ला दिल्लीला राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला. नंतर या चित्रपटाच्या सगळ्या भाषांत कॉपीज निघाल्या. १४ भाषांत डबिंग झाले. 'आकाशाची फळे' या ग.दि. माडगुळकरांच्या कथेवर हा चित्रपट तयार केला होता. फॅमिली प्लॅनिंगवरचा तो चित्रपट होता. स्नेहप्रभा प्रधान यांनी हैद्राबादवरून आणलेला कोरीव काम केलेला फ्लॉवरपॉट त्यांच्याकडून वैयक्तिक बक्षीस म्हणून मला दिला. दुर्गाबाईंनी तर मला मिठीच मारली. दिल्लीला जसे पुरस्कार प्रदान सोहळे होतात तसाच राज्य पुरस्कार सोहळा झाला. त्या कार्यक्रमाला पृथ्वीराज कपूर, के.एन.सिंग अशी हिंदीतली कलावंत मंडळीही आली होती. पाचशे रुपये आणि बाहुली असा तो पुरस्कार होता. तेव्हा पाचशे रुपयेही खूप मोलाचे होते. महाराष्ट्र शासनाची या पुरस्कारासाठी तयार करण्यात आलेली नऊवारी साडीतली बाहुली माझ्या एका चित्रपटातल्या माझ्या फोटोवरून केल्याचं नंतर कधी तरी मला सचिनने सांगितलं तेव्हा मला समजलं.

त्यानंतरचे राज्य सरकारचे चित्रपट महोत्सव पुरस्कार सोहळे रंगभवनात व्हायला लागले. १९६७ सालच्या पुरस्कारांत 'गोरा कुंभार' चित्रपटासाठी मला सहाय्यक अभिनेत्री म्हणून जाहीर झाला. मला आश्चर्य वाटलं, खरं तर ती भूमिका मुख्य भूमिका होती. मी तो पुरस्कार नाकारला. आणि त्या वर्षीच्या कार्यक्रमाला मी गेले नाही. पुरस्कार नाकारणारी मी पहिलीच असावी. मुख्य भूमिकेसाठी सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार कसा काय दिला जातो, या विषयी त्यावर्षी खूपच चर्चा झाली. वर्तमानपत्रातून विषय गाजला, अण्णा माडगूळकरांनी मग त्यातून मार्ग काढला. त्यावेळचे सांस्कृतिक मंत्री बाबुराव बोरोस्कर यांनी त्यांच्याच दालनात छोटा समारंभ केला आणि तिथे मला तो विशेष अभिनेत्रीचा पुरस्कार काही दिवसातच दिला गेला. त्या कार्यक्रमाला डॉ. काशिनाथ घाणेकर, भारतमाताचे विनायकराव सरस्वतेही हजर होते. त्यानंतर मग शासनाच्या पुरस्कारांमध्ये सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार जाऊन त्याजागी विशेष अभिनेत्रीचा पुरस्कार सुरू झाला.

पुरस्कारामुळे उत्साह वाढतो आणि आपल्याकडून आणखी चांगल्या अभिनयाची अपेक्षा केली जाते याची जबाबदारीही येते. कदाचित त्या चित्रपटाच्या चालण्यावरही परिणाम होतोच. पुरस्काराने तुम्हाला एक प्रकारची मान्यताही मिळते.

आजवरच्या पुरस्कार सोहळ्यापैकी एक दोन कार्यक्रम सोडले तर मी सर्व कार्यक्रमांना हजर होते. मध्ये औरंगाबादला कार्यक्रम होता तिथेही गेले. एखाद दुसरा महोत्सव शूटिंगमुळे माझ्याकडून सुटला असेल. मात्र मला असं वाटतं की हा महोत्सव हा आपल्याच व्यवसायाचा भाग आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहणे ही व्यवसायात असणाऱ्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपल्याला पुरस्कार मिळाले की आपण जायचं आणि इतरांनी आपलं टाळ्या वाजवून कौतुक करायचं. मग दुसऱ्याचं कौतुक करायला, प्रोत्साहन द्यायला आपण नको जायला?

दादासाहेब फाळकेंच्या जन्मदिनी ३० एप्रिलला

राज्य पुरस्कार सोहळा होतो, म्हणून चित्रपटाच्या शूटिंगसाठी मी ती तारीख देत नसे. जयश्री गडकर, सीमा सगळ्यांनाच मी सांगायचे की इतरांचे कौतुक करण्यासाठी तुम्हीही यायला हवं. सीनिअर आर्टिस्ट कार्यक्रमाला आल्यावर काय आनंद असतो तो इतरांनाही मिळू द्या.

एक चांगलं झाले की शासनाने ऑस्कर पद्धतीने पुरस्कार सोहळा सुरू केला आणि नंतर कलावंत सोहळ्याला येण्याची संख्या वाढली. पुरस्कार जाहीर झाल्यावर अनेकदा ते घेण्यासाठी कलावंत येत नाहीत, हे बरोबर नाही. त्यांनी पुरस्कार घ्यायला यायलाच हवं. जे येणार नाहीत त्यांना दुसरा पुरस्कार देऊ नये असं मला वाटतं. पण पुरस्काराचा अपमान मात्र कोणी करू नये. दिल्लीच्या पुरस्कारात ज्याप्रमाणे हजर राहणार तरच पुरस्कार देणार असा नियम आहे तसाच नियम आपल्याकडेही करायला हवा.

त्यावेळी पुरस्कार सोहळ्यांना पृथ्वीराज कपूर, जयराज, डेव्हिड, के. एन. सिंग, बलराज सहानी, सुनिल दत्त, नर्गिस ही मंडळी येत असत.

१९७१ सालच्या पुरस्कार सोहळ्याला दक्षिणात्य अभिनेते शिवाजी गणेशन प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. त्यांनी पंधरा हजार रुपये सरकारला देऊन माझ्या आठवणीने उत्कृष्ट अभिनेत्याला पुरस्कार द्यावा असे सांगितले. त्यानंतर दुसऱ्याच वर्षापासून उत्कृष्ट अभिनेत्याच्या पुरस्काराला शिवाजी गणेशन यांचे नाव देण्यास सुरुवात झाली. त्याचवेळी माझ्या मनात आले की आपल्या मराठी चित्रपटसृष्टीत अनेक महान कलावंत आहेत त्यांचीही नावं पुरस्कारांना द्यायला हवीत. राजा ठाकूर, राजा परांजपे, अनंत माने, माधव शिंदे, दत्ता धर्माधिकारी आदींची नावं पुरस्काराला द्यावी असं मी त्यावेळी सुचविले. त्यासाठी मंत्रीमहोदयांना पत्रंही लिहिली. सतत यासाठी सांगत राहिले. नंतर मात्र सरकारने या पुरस्कारांना कलावंतांची, दिग्दर्शकांची नावं दिली. मात्र नंतर काही कार्यक्रमात असं दिसतं की नावं वाचलीच जायची नाहीत. मग ती नावं देण्यात काय अर्थ उरत होता. म्हणून ही नावं कार्यक्रमात वाचली जावीतच म्हणून पुन्हा पत्र लिहिले. मग ही पुरस्कारांना दिलेली कलावंतांची नावे वाचली जाऊ लागली. हे पुरस्कार स्वीकारण्यातही इतर कलावंतांना आनंद होतो.ज्यांच्या नावाचा हा पुरस्कार आहे, त्या नावाने मिळणारा पुरस्कार त्या त्या कलावंतांना निश्चितच अभिमानास्पद वाटतो. नंतर कलादिग्दर्शन पुरस्कारासाठी फत्तेलाल यांचे नाव आले. गजानन जहागिरदारांनी मुलांसाठी पुरस्कार सुरू केला.

माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील सांस्कृतिक मंत्री असताना रंगभूषाकार आणि वेषभूषेसाठीही पुरस्कार द्यायला हवेत असे सुचवलं. त्याचवेळी नृत्यदिग्दर्शक म्हणून पुरस्कार द्यावेत असं एका समारंभात मी प्रतिभाताईना पत्र दिले. त्यांनी हे पुरस्कार पुढच्या वर्षीपासून सुरू करू असे सांगितले आणि तसा हा पुरस्कार सुरूही झाला.

मराठी चित्रपटांचा आजवरचा प्रवास मोठा आणि लक्षणीय आहे, काही खाचखळगे आलेही असतील पण त्यातूनही चित्रपटांनी आपल्या वाटा शोधल्या.

कृष्णधवल सिनेमा जाऊन रंगीत सुरू झाला. चांगले बदल झाले. तसे राज्य शासनाच्या पुरस्कारांच्या यादीतले पुरस्कार वाढले. पुरस्कारांची रक्कम वाढली. त्या वेळी पुरस्कार निवड समितीत ग.दि. माडगूळकर, गजानन जहागिरदार, विनायकराव सरस्वते अशी जाणती मंडळी होती. मीही परीक्षक म्हणून काम केले आहे. आता चित्रपट चांगले निघत आहेत. विषयाची विविधता आहे.

पूर्वी एक काळ तमाशापटाचा होता. त्याचा अतिरेक झाला. मधला काळ लोकांनी चित्रपटाकडे पाठ फिरवली. तेव्हा प्रेक्षकांना खेचून घेण्याचे काम दादा कोंडकेंनी केले. मग तिथेही अतिरेक झाल्यावर पुन्हा मंदी आली. मग महेश कोठारे, सचिन पिळगावकर यांनी प्रेक्षकांना थिएटरकडे खेचण्याचे काम केले. नंतर मराठी चित्रपटांला जागतिक पातळीवर नेण्याचे काम 'श्वास'ने केले. मराठी चित्रपट ऑस्करपर्यंत जाऊन पोहचला. हा मोठा बदल होता. मोठी कामगिरी होती.

आता तर गेल्या दोन-तीन वर्षात पाहिले तर मराठीने राष्ट्रीय स्तरावर मोहोर उमटवली आहे. संपूर्ण हिंदुस्थानने मान्य केले की मराठी चित्रपट उत्तम आहेत.

पूर्वी कथानकांसाठी मराठी चित्रपट पाहिले जात

होते. साहित्यावर आधारित चित्रपट निघत होते. बंगाल, दक्षिण भारतातून मराठी चित्रपट पाहायला येत होते. 'वहिनीच्या बांगड्या' हा चित्रपट तर बंगालीसह तामिळ, तेलगू, कानडी भाषेतही झाला. एल. व्ही. प्रसाद दक्षिणेचे मोठे दिग्दर्शक. त्यांचा तो पहिला चित्रपट होता आणि तो सुपरहिट झाला.

बंगालीमध्ये 'चिमणी पाखरं' चित्रपट झाला. हिंदीतही निघाला. दत्ता धर्माधिकारी बंगालला शताब्दी महोत्सवासाठी गेले होते. त्यावेळी बंगालमध्ये हा मराठीतला सर्वश्रेष्ठ दिग्दर्शक आहे, अशाच पद्धतीने लोकांनी त्यांच्याकडे पाहिले, स्वागत केले.

त्यावेळी चित्रपटाचे कथानक हे मराठी चित्रपटाचे बलस्थान होते. राजा परांजपे, माधव शिंदे, राजा ठाकूर ही कोणी फार शिकलेली माणसं नव्हती. मात्र त्यांचे वाचन दांडगं होतं. नाथमाधवांच्या कादंबरीवर माधव शिंदे यांनी 'चिमणी पाखरं' बनवला. 'शिकलेली बायको', 'कन्यादान' हे चित्रपट कादंबरीवरून चित्रपट तयार केलेले होते. दत्ता रघुनाथ कवठेकर यांच्या 'रुपेरी कडा'वर माधव शिंदे यांनी 'सूनबाई' चित्रपट काढला.

कथानक हाच चित्रपटाचा कणा असतो तो चांगला असेल तर चित्रपट चांगला बनतो, चित्रपट चालणं न चालणं हा नंतरचा भाग.

महाराष्ट्र शासनाच्या अनुदानाचा प्रभाव आहे. मराठी चित्रपटांना ऊर्जा मिळाली. या अनुदानाचा दुरुपयोगही होतोय, पण दुरुपयोगापेक्षा चांगला परिणाम आहेच. आता मराठीकडे लोक वळत आहेत. पूर्वी १० रुपये सिनेमाचं तिकिट होते. १० रुपयात अमिताभ बघायला मिळतो तर मराठीत चित्रपट का बघायचा म्हणून प्रेक्षक हिंदी चित्रपट पहायला जात. आता तिकिटाचे दर वाढलेत तरी मराठी चित्रपट पाहायला लोक येताहेत ही आनंदाची गोष्ट आहे. एक मात्र आहे, लोकाश्रय, राजाश्रय हे कोणत्याही कलेसाठी पोषकच असते. चित्रपटसृष्टीतील मंडळींनी शासनाच्या पुरस्कार सोहोळ्यास आवर्जून उपस्थित राहायला हवे एवढे मात्र यानिमित्ताने मला मनापासून सांगावेसे वाटते.

*शब्दांकन : शीतल करदेकर*

ग.दि. माडगूळकर यांना त्यांच्या कारकीर्दीत पटकथा, संवाद आणि गीते यासाठी एकूण अकरा पुरस्कार मिळाले होते. पहिल्याच वर्षी 'शाहीर परशुराम'साठी सर्वोत्कृष्ट पटकथा आणि सर्वोत्कृष्ट संवाद, तसेच 'प्रपंच'साठी सर्वोत्कृष्ट गीते असे तीन पुरस्कार गदिमांना मिळाले होते. दुसऱ्या महोत्सवात सर्वोत्कृष्ट गीते- 'गरीबाघरची लेक', तिसऱ्या महोत्सवात सर्वोत्कृष्ट पटकथा 'पाठलाग' आणि सर्वोत्कृष्ट गीते 'वैशाखवणवा', सहाव्या महोत्सवात सर्वोत्कृष्ट गीते 'संथ वाहने कृष्णामाई', नवव्या महोत्सवात सर्वोत्कृष्ट गीते 'नंदिनी', पंधराव्या महोत्सवात सर्वोत्कृष्ट गीते (विभागून) 'बाळा गाऊ कशी अंगाई' असे पुरस्कार त्यांना लाभले, तर सोळाव्या महोत्सवात त्यांना त्यांच्या निधनानंतर सर्वोत्कृष्ट पटकथा (विभागून) 'देवकीनंदन गोपाळा' आणि सर्वोत्कृष्ट गीते 'देवकीनंदन गोपाळा' असे पुरस्कार मिळाले. विशेष म्हणजे सोळाव्या महोत्सवापासून, उत्कृष्ट गीतकाराला गदिमांच्या नावाने ग.दि. माडगूळकर पुरस्कार दिला जाऊ लागला आणि वैशिष्ट्य हे, की त्यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार सर्वप्रथम ग.दि. माडगूळकर यांनाच 'देवकीनंदन गोपाळा' चित्रपटातल्या गीतांसाठी मरणोत्तर देण्यात आला.

# विक्रमी पार्श्वगायिका आशा भोसले

ललिता ताम्हणे

गेल्या पन्नास दशकांहून अधिक काळ संगीतप्रेमी रसिकांच्या भावविश्वावर अधिराज्य गाजवणाऱ्या लोकप्रिय गायिका आशा भोसले या खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची शान आहेत, मराठी माणसाचा मानबिंदू आहेत. सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम तर त्यांनी केला आहेच, पण मराठीतही एक हजारपेक्षा जास्त गाणी आशा भोसले यांनीच गायलेली आहेत. याखेरीज, १९६२ सालापासून सुरू झालेल्या 'महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार' महोत्सवात 'उत्कृष्ट पार्श्वगायिका' म्हणून सर्वाधिक म्हणजे तब्बल सतरा वेळा पुरस्कार मिळवण्याचा विक्रमही आशा भोसले यांच्याच नावावर जमा आहे. अगदी पहिल्या वर्षी 'मानिनी'साठी, दुसऱ्या वर्षी 'रंगल्या रात्री अशा'साठी, त्यानंतर सहाव्या, सातव्या, आठव्या, नवव्या आणि दहाव्या अशा सलग पाच वर्षांत त्यांना अनुक्रमे 'संथ वाहते कृष्णामाई', 'आम्ही जातो आमुच्या गावा', 'अपराध', धाकटी बहीण' आणि 'घरकुल' या चित्रपटांसाठी 'सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका' म्हणून पुरस्कार प्राप्त झालेला आहे. सलग पाच वर्ष हा पुरस्कार मिळवणं हाही एक आगळा-वेगळा विक्रमच म्हणायला हवा. त्यांचे हे विक्रम कधीही, कोणीही मोडू तर शकणार नाहीच, पण त्या विक्रमांची साधी बरोबरी करणंही अत्यंत अवघड आहे.

महाराष्ट्र शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्काराच्या गेल्या पन्नास वर्षांच्या साक्षीदार असलेल्या आशा भोसले यांना शासनाच्या या पुरस्काराचं खूप महत्त्व वाटतं. त्याविषयी बोलताना त्या म्हणाल्या, 'मला पहिला पुरस्कार मिळाला, तेव्हा मी काश्मीरला होते. हा पुरस्कार घेण्यासाठी मी एकटी काश्मीरहून परत आले होते, मुलं वगैरे तिथेच राहिली होती. मला खूप आनंद झाला होता, की मला महाराष्ट्र राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला! ते एका दृष्टीने राजमान्यता मिळाल्यासारखं असतं. त्यानंतर मग पुरस्कार मिळतच गेले. मी गात होते, पुरस्कार मिळतच होते. नंतर मग मराठीत गाणं कमी झाल्यावर हे पुरस्कार मिळणं बंद झालं. मराठीचं वातावरण पहिल्यासारखं राहिलं नाही. मग मी हिंदीत खूप गायला लागले.'

महाराष्ट्र शासनाच्या पुरस्काराविषयी आशा भोसले यांच्या मनात नितांत आदर आहे. म्हणाल्या, ''हिंदीत जसं 'फिल्मफेअर' पुरस्काराला महत्त्व आहे, तसंच मराठीत 'महाराष्ट्र राज्य पुरस्कारा'ला खूप महत्त्व आहे. मला आठवतंय, नेहमी 'रंगभवन'ला हा सोहळा व्हायचा. आम्ही 'रंगभवन'ला जायचो पुरस्कार घ्यायला. सतरापैकी फक्त एक पुरस्कार घ्यायला मी जाऊ शकले नव्हते. माझ्या वतीने माझ्या मुलांनी जाऊन तो पुरस्कार घेतला होता. त्या वर्षी सत्यजित रे होते पुरस्कार द्यायला. पण तेवढ्या एका पुरस्काराचा अपवाद वगळता सगळे पुरस्कार मी स्वत: जाऊन घेतलेले आहेत. सगळे अगदी नटून थटून यायचे या पुरस्कार सोहळ्याला. म्हणजे एखाद्या लग्नाला जावं तसे यायचे. मुख्य म्हणजे तेव्हा आत्तासारखं मॉडर्न वातावरण नव्हतं, बजबजपुरी नव्हती. एक खरेपणा होता, खोटेपणा काही नव्हता. त्यामुळे फार बरं वाटायचं.''

महाराष्ट्र राज्य पुरस्काराविषयीच्या आपल्या भावना स्पष्ट करताना आशा भोसले म्हणाल्या, ''तशी मला खूप अॅवॉर्डस् मिळाली. कलकत्ता वगैरे वेगवेगळ्या प्रांतातलीही मिळाली. पण मी कधी ती अॅवॉर्डस् घ्यायला पोहोचलेच नाही. मी फक्त महाराष्ट्र स्टेट अॅवॉर्ड घ्यायला जायची. महाराष्ट्राचं प्रेम मला असणार नाही, तर कोणाला असणार? मी मराठी



छाया - गौतम राजाध्यक्ष

आहे, मी महाराष्ट्रीय आहे. आणि एवढे सगळे मोठमोठे लोक असताना आपल्याला पुरस्कार मिळतो, त्यामुळे स्वत:विषयी आत्मविश्वासही वाटतो, की मी नक्कीच चांगलं काम केलेलं आहे. आणि मराठीतली जवळजवळ हजारएक गाणी तर माझ्या एकटीच्या नावावर आहेत. आता तेवढी गाणीही बनत नाहीत, तसे संगीतकारही आता नाहीत आणि पूर्वीसारखे तेवढी मेहनत घेऊन गाणारे गायकही नाहीत. मी एकदा 'प्रभात स्टुडिओ'त एका दिवसात सात गाणी गायले होते. त्यातलं एक गाणं होतं, 'बुगडी माझी सांडली गं' दुपारी दोन वाजल्यापासून पहाटे चार वाजेपर्यंत मी गात होते. त्या दिवशी मी दोन चित्रपटांची गाणी गायले होते, त्यापैकी एक चित्रपट होता 'सांगते ऐका'. म्हणजे एका दिवसात सात गाणी गाणं, हाही एक विक्रम आशा भोसले यांच्या नावावर जमा आहे.

प्रत्येक कलाकाराच्या दृष्टीने सगळेच पुरस्कार महत्त्वाचे असतात, पण महाराष्ट्र राज्य पुरस्कार सतरा वेळा मिळवणाऱ्या आशा भोसले यांना 'महानंदा'



छाया - गौतम राजाध्यक्ष

आणि 'एक होता विदूषक'च्या गाण्यांसाठी मिळालेले पुरस्कार अधिक महत्त्वाचे वाटतात. 'महानंदा'मधलं 'मागे उभा मंगेश' फार छान गाणं आहे. हे गाणं आजही तेवढंच चालतं. त्यातल्या भावना पण फार वेगळ्या आहेत. त्याचप्रमाणे 'एक होता विदूषक'ची गाणी चांगली होती. त्यात लावण्या होत्या. पण तशी तर या सगळ्याच चित्रपटांची गाणी खूप छान होती. आता तसे चित्रपट होणार नाहीत, तशा कथा असणार नाहीत. पूर्वीप्रमाणे, महाराष्ट्रातला साधेपणा आता चित्रपटात दाखवला जाणार नाही. मी अधून-मधून टीव्हीवर वगैरे मराठी चित्रपट बघते. पण मला आता मराठीत कुठेही मराठीपण दिसत नाही. पूर्वी आपल्या कथा किती सुंदर असायच्या. 'माझं बाळ', 'स्त्री-जन्मा ही तुझी कहाणी', 'लाखाची गोष्ट' वगैरे, अनंत माने काय सुरेख चित्रपट करायचे. पु.ल. देशपांडे होते. त्यांच्याबरोबर पण मी किती काम केलंय. मी मराठी पुरस्कारांची पन्नास वर्ष आणि हिंदीचीही पासष्ट वर्ष बघितलेली आहेत. पूर्वीच्या 'सांगत्ये ऐका' मध्ये महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचं दर्शन घडलंय, आत्ताच्या 'काकस्पर्श'मध्ये कोकण दाखवलंय, तसे आता येणाऱ्या लोकांनीही प्रयत्न केले पाहिजेत. मराठी संगीतातलंही मराठीपण गेलंय सगळं. सगळा हिंदी संगीताचा प्रभाव आहे. आता गाण्यांमध्ये इंग्लिश शब्द असतात. मला स्वत:ला ते पटत नाही. मला असं वाटतं, की मराठी चित्रपटांत संगीताच्या दृष्टीनेही खूप सुधारणा व्हायला पाहिजेत.''

बोलता-बोलता आशा भोसले यांनी त्यांच्या मनातली खंत स्पष्टपणे बोलून दाखवली. आत्ताचे आणि उद्याचे निर्माता-दिग्दर्शक-गीतकार-संगीतकार आणि गायक यातून काही बोध घेतील, अशी आशा बाळगायची का?

महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका म्हणून तब्बल सतरा पुरस्कार मिळवून आशा भोसले यांनी आगळावेगळा उच्चांक प्रस्थापित केलेला आहे. पहिल्याच वर्षी 'मानिनी'साठी, दुसऱ्या वर्षी 'रंगल्या रात्री अशा'साठी, सहाव्या, सातव्या, आठव्या, नवव्या आणि दहाव्या अशा सलग पाच महोत्सवात अनुक्रमे 'संथ वाहते कृष्णामाई', 'आम्ही जातो आमच्या गावा', 'अपराध', 'धाकटी बहीण' आणि 'घरकुल'साठी, त्यानंतर 'सुगंधी कट्टा', 'हा खेळ सावल्यांचा', 'बाळा गाऊ कशी अंगाई', 'महानंदा', 'पुढचं पाऊल', 'बंदिवान मी या संसारी', 'कळत नकळत', 'चौकट राजा', 'एक होता विदूषक' आणि 'राजू' या चित्रपटातल्या गाण्यांसाठी आशा भोसले यांना हा पुरस्कार मिळालेला आहे.

# शाबासकीची थाप

सीमा देव

हे वर्ष भारतीय चित्रपटसृष्टीचे शतकमहोत्सवी वर्ष. आणि योगायोग म्हणजे, या वर्षी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या पुरस्कार समारंभाला ५० वर्षे पूर्ण झाली.

महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या या समारंभाची मी एक साक्षीदार आहे. शासनाने पुरस्कार प्रदान करण्याची योजना सुरू केली आणि कलाकारांमध्ये एक प्रकारचा उत्साह निर्माण झाला. तंत्रज्ञांपासून कलाकारांपर्यंत सगळेच खूष झाले. आपण जी कला सादर करतो त्याचं या पुरस्कारामुळे सार्थक होईल ही भावना प्रत्येकाच्या मनांत निर्माण झाली.

पुरस्काराचे पहिले वर्ष, तो दिवस ३० एप्रिल. लिबर्टी चित्रपटगृहात कलाकार, तंत्रज्ञ व इतर मान्यवर आमंत्रितांनी हजेरी लावली होती. तो एक आनंदाचा सोहळा होता. एक वेगळाच उत्साह सगळ्यांमध्ये दिसत होता. नामांकन झालेले कलावंत व इतरही कलावंत, तंत्रज्ञ यांच्यात एक तऱ्हेची उत्सुकता, आशा, असे मिश्र भाव दिसत होते.

पहिल्याच वर्षी ज्यांना पुरस्कार मिळाले ते व ज्यांना मिळाला नाही तेही, पुढच्या वर्षी आणखी चांगलं काम करून पुरस्कार नक्की मिळवू. या आनंदात होते. १९६४ साली मला स्वत:ला 'पाहु रे किती वाट' या चित्रपटासाठी 'उत्कृष्ट अभिनेत्री'चा पुरस्कार मिळाला. आणि त्यावेळी मला व माझ्या



कुटुंबियांना झालेला आनंद अवर्णनीय होता. त्यानंतर प्रत्येक वर्षी ३० एप्रिल हा सणाचा दिवस असल्या सारखे नटून थटून प्रत्येक जण रंगभवनमध्ये जात होतो. हळूहळू पुरस्काराचे स्वरूप बदलत गेले. म्हणजे पुरस्काराची रक्कम वाढत गेली. नंतर श्री. राज कपूर यांच्या नावाने पुरस्कार सुरू झाला. दाक्षिणात्य कलावंतानाही त्यात सामील केले गेले.

मी व रमेश या जोडीला व्ही. शांताराम पुरस्कारही मिळाला. प्रत्येक पुरस्कार कलाकाराला वेगळाच उत्साह देतो. आणि कलाकार जास्त चांगलं काम करण्याचा प्रयत्न करतो. पुरस्कार कलाकारासाठी एक टॉनिक आहे. तो मिळो वा न मिळो. यावर्षी नाही पुढच्या वर्षी नक्कीच मिळेल ही जिद्द निर्माण करतो. असा पुरस्कार सोहळा ५० वर्षांपूर्वी सुरू केल्याबद्दल आम्ही सर्व कलावंत शासनाचे आभारी आहोत.

एक खंत मात्र जरूर मनात सलते की ५० वर्षांपूर्वी, म्हणजे शासनाने पुरस्कार सुरू करण्यापूर्वी ज्या कलावंतांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली होती ते या आनंदाला मुकले. असो, आज अशी परिस्थिती आहे की गल्लोगल्ली पुरस्कार दिले जातात. पण शासनाचा पुरस्कार ही एक पाठीवर मिळालेली शाबासकीची थाप आहे. जी कलाकारासाठी जरूरी आहे.

# ...दिवस चांगले आलेत!

राजदत्त

मागील ५० वर्षांचा विचार करताना आपल्या मराठी चित्रपटांना आधार देण्याचे काम सरकारी पुरस्कारांनी आणि इतर योजनांनी केलं आहे. पुरस्कारामुळे चित्रपट व्यवसायाला प्रतिष्ठा मिळाली. ज्या व्यवसायाकडे 'हे काय सिनेमावाले' अशा भावनेतून पहायलं जायचं ती भूमिका बदलली. मराठी चित्रपटसृष्टी एक इंडस्ट्री म्हणून उभी राहावी म्हणून आधार देण्याचे कामही झालं. विषय-आशयदृष्ट्या बरे प्रयत्न झाले, तांत्रिकही प्रगती केली, मात्र या व्यवसायासाठी लाणारे आपले असे तंत्रज्ञान विकसित केले नाही.

आजवरच्या मराठी चित्रपटातून उत्तम आणि सकस साहित्य मिळालं आहे. चित्रपट माध्यमातील साहित्याचा फॉर्म वेगळा असला तरी ते सांगण्याची, मांडण्याची त्याची वेगळी अशी ताकद आहे. 'सावकारी पाश' चित्रपटात नुसतं सामाजिक भान नाही तर या विषयाला भिडण्याचा, त्यातून अंतर्मुख होण्याचा प्रयत्नही झाला. करमणुकप्रधानता ही या व्यवसायात राहिलीच. मात्र त्याचबरोबर आपल्यापरीने चांगले ते देण्याचा प्रयत्न या व्यवसायातील अनेक व्यक्तींनी केला.

'कुंकू', 'माणूस' सारखे चित्रपट ही प्रभातची सशक्त अशी परंपरा होती. या माध्यमातून काय

सांगायचे आणि कसं सांगायचं, हे तंत्र नक्की काय आहे ते कसं वापरायचं, ते बऱ्यापैकी समजलं. मात्र यातील तांत्रिक बाबी आपण स्वत: तयार कराव्यात हे भान आजही आलेलं नाही. या बाबत आपल्याला ऋण मानावे लागेल ते चित्रमहर्षी बाबुराव पेंटर यांचे. त्यांना परदेशातून येणाऱ्या कॅमेऱ्याबद्दल कुतूहल होते. त्यामुळे त्यांनी कॅमेऱ्याचे भाग सुटे केले आणि पुन्हा जोडले. त्यातले तंत्र अवगत करण्याचा प्रयत्न केला.

हॉलिवूडप्रमाणे चांगल्या कंपन्या आपल्याकडे तयार झाल्या, मात्र या कंपन्यावर एकेका व्यक्तीचं प्राबल्य राहिलं. तो वारसा जतन करण्याचे, संवर्धन करण्याचे काम झाले नाही. न्यू थिएटर्सचा दहा वर्षांचा आणि प्रभातचा काळ याला अपवाद आहेत. आपली कृती आणि व्यापार याच भान न राहिल्यामुळे आपल्या चित्रपटसृष्टीने खूप चढउतार पाहिले.

इ.स.१९४६ पर्यंत असलेल्या सामाजिक परिस्थितीचा विचार केला तर त्यातील विषय हे चित्रपटाचे चांगले विषय ठरू शकले असते. समाजात होणारा बदल मांडण्यास वाव होता मात्र एक दोन व्यक्तींची उदाहरणं सोडली तर, या बदलाचे चित्रण संवेदनशीलतेने मांडण्याचे प्रयत्न झाले नाहीत. हे विषय ओळखण्याची ती नजर असावी लागते. त्या विषयाची सल समजावी लागते.

गाडगे महाराजांवर 'देवकीनंदन गोपाला' चित्रपट मी केला. गाडगेबाबांनी ज्या अंधश्रद्धेचा आणि भावुकतेवर प्रहार केला ते मांडायचं होतं. गाडगेबाबा पंढरपूरपर्यंत जात मात्र तिथल्या देवळात जात नसत. मात्र १९७६नंतर गाडगेमहाराजांची मूर्ती असलेलं देऊळ त्यांच्याच गावात महत्त्वाचं होतं. या सगळ्या अभ्यासातून मग 'देवकी नंदन गोपाळा' तयार झाला.

'शापित' चित्रपटाचे उदाहरण देता येईल. समाजातल्या गुलामगिरीचा विषय स्नेहलताबाई दसनूरकरांनी यात मांडला होता. 'शापित' चित्रपटांचा संहिता तयार झाल्यानंतर चित्रपट माझ्याकडे आला. तयार असलेली पटकथा जशीच्या तशी मांडणं म्हणजे चित्रपटाचे दिग्दर्शन करणं इतकाच विचार करून चालत नाही हेच आम्ही शिकलो होतो.

महत्त्वाचं असं की, कोणताही विषय दिग्दर्शनासाठी आल्यावर प्रथम तो दिग्दर्शकाला



समजाला पाहिजे त्याची नस ओळखता आली पाहिजे. नीग्रोंच्या गुलामगिरी बद्दल आमच्या पिढीने वाचले होते. पण आपल्याकडे अशी गुलामगिरी आहे का हा प्रश्न माझ्या मनात आला आणि मी तो विषय समजून घेण्यासाठी कथा, कादंबऱ्या, इंग्रजीतले साहित्यही वाचले. पण तरीही माझं समाधान झालं नाही.

मला 'शापित'चं ते सगळे कथानक ही एक कथा वाटत होती. समस्या वाटत नव्हती. एके ठिकाणी मी पाहिलं की एका न्यायमूर्तींच्या घरी त्यांच्या ऑफिसचा पट्टेवाला आणि त्याची बायको घरकामाला यायची. दोघेही -त्यांच्यापरीने राबायची. मी त्याला विचारले, नोकर कोणाचा? पगार कोणाचा घेतोस? सरकारचा ना? मग ही कामे का करतोस? तर त्यावर तो म्हणाला, साहेब मी नोकरीत कायम नाही. जर साहेबांनी पत्र दिलं तर माझं काम होऊ शकतं. ही त्याची अगतिकता होती. त्या अडलेल्या माणसाच्या परिस्थितीचा दुरुपयोग दुसरा माणूस करून घेत असतो. अशा प्रकारे जेव्हा दिग्दर्शक कलाकृतीचा विचार करतो तेव्हा चित्रपट आणखी आशयघन होतो. त्या साहित्यातल्या शब्दापलीकडचे मर्म समजून घ्यावे लागते. तरच त्यातून उत्तम चित्रपट निर्माण होतो. अशा तऱ्हेचे विचार करणाऱ्यात सत्यजित राय यांचे उदाहरण प्रामुख्याने देत येईल. त्यांच्या 'पथेर पांचाली'त नाट्यमयता नाही. तरीही त्यातली बोच, ते जीवन सत्यजितांनी अचूकपणे आपल्यापर्यंत पोहोचवलं आहे. राजा परांजपेंच्या चित्रपटांची उदाहरणं देता येतील.



आशयगर्भ अशी कलाकृती जर प्रेक्षकांपर्यंत पोहोचलीच नाही तर मग गडबड होते. आपल्याकडच्या अनेक चित्रपटांबाबत हे म्हणता येईल. चित्रपटाला पुरस्कार मिळाले, राज मान्यता मिळाली, मात्र ते लोकांपर्यंत पोहोचलेच नाहीत. दादासाहेब फाळके यांनी त्यांचा चित्रपट लोकांनी पहायला यावे म्हणून ज्या प्रकारे प्रसिद्धी केली होती ती लक्षात घेण्यासारखी आहे. आशय, तंत्र, कलात्मकता आणि व्यापार या सगळ्यांचे गणित जमणे गरजेचे आहे. याबाबतीत आपण कुठेतरी कमी पडलो. त्यामुळे जी प्रगती या उद्योगाची १०० वर्षात अपेक्षित होती झाली नाही.

मागील ५० वर्षांचा विचार करता वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे, ग.दि.माडगूळकर अशी थोडीफार साहित्यिक मंडळी या व्यवसायात आली. मात्र त्यांच्या इतर साहित्याचं योग्य ते मूल्यांकन झालं नाही. यासाठी ग. दि. माडगूळकरांचे उदाहरण देता येईल. १९७३च्या अमरावतीला झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ग.दि.माडगूळकरांना देण्याचे ठरले तेव्हा, हा कोण सिनेमावाला म्हणून चर्चा झाली. साहित्यत जातवारी करण्याचा प्रकार घातक ठरला. लिहिलेली कथा चित्रपटाच्या पडद्यावर आणताना तिचा ज्या पद्धतीने विचार होतो आणि ज्या पद्धतीने तिला एक आयाम मिळतो तो त्यामुळे अनेक कथांना मिळाला नाही. 'ही सिनेमावाली माणसं' असा या क्षेत्राकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन होता त्यामुळे चित्रपटांना चांगलं सामाजिक पाठबळ मिळालं नाही. अशीच भावना साहित्यिकांतही दिसून आली. चित्रपटासाठी लिखाण करणारे तसे दुय्यम साहित्यिक मानले गेले. त्यामुळे कदाचित चांगले साहित्यिक स्वत:च्या मर्यादा कक्षेतून चित्रपट क्षेत्रात आले नाहीत. याच कारणाने नवीन विषय, नवीन विचार, नवीन समर्थन यात कुठेतरी उणीव राहात गेली. प्रसिद्धी, मिळणारा पैसा हे जरी चित्रपट माध्यमाचं आकर्षण राहिलं, तरी सुद्धा चांगले विषय आणि चांगली हाताळणी ही चित्रपटांची ताकद राहिली आहे. मात्र ही जी ताकद आहे ती मोठ्या प्रमाणावर वापरली गेली नाही.

मराठी संत साहित्याचे अभ्यासक दत्तो वामन पोतदारांनी 'संत तुकाराम' चित्रपट पाहिला. त्यातले अभंग त्यांच्या कानावर पडल्यावर हे तुकारामांचेच अभंग आहेत, पण माझ्या अभ्यासात कसे कधी सापडले नाहीत, म्हणून ते अस्वस्थ होऊन तुकारामांच्या गाथा धुंडाळू लागले. पण जेव्हा त्यांच्या लेखात आले की, हे चित्रपटातील अभंग कुणा शांताराम आठवले नावाच्या गृहस्थाने लिहिले आहेत तेव्हा त्यांना कौतुक वाटलेच. इतकी सकसता आठवलेंच्या लिखघाणात होती.

स्वातंत्र्योत्तर काळात काळापैसावाले, ज्यांना समाजात प्रतिष्ठा नाही अशी माणसं या क्षेत्रात आली. केवळ पैसा कमावणे हेच त्याचं लक्ष्य होतं. पैशाच्या दृष्टीने या क्षेत्रात सुदृढता आली पण आशयाच्या बाबतीत व्हावा तसा विकास झाला नाही. बाजारूपणा आला, मात्र याला थोडाफार छेद देण्याचा प्रयत्न शासनाचे केल्याचे दिसते. पुरस्काराच्या रूपाने शासनाचे एक चांगले पाऊल उचलले. त्यामुळे काही आशयघन चित्रपटांची निर्मितीही झाली.

गेल्या वीस वर्षात या क्षेत्राचे स्वरूप बदलू लागले आहे. पूर्वी चित्रपटाच्या वलयामुळे कलावंतांच्या प्रतिष्ठा मिळत होती. ते चित्र पालटून कलावंतांच्या नावाच्या निकषावर चित्रपट ठरू लागले. कलाकृतीपेक्षाही कलावंतांकडे आकृष्ट होऊन लोक चित्रपट पहायला यायला लागले. आज चांगले विषय आले पाहिजे हे भान रुजायला लागले आहे. पुन्हा या चित्रपटसृष्टीला चांगले दिवस येतील ही आशा वाटू

लागलीय. एका अर्थाने नैराश्य जाऊन उमेद वाढू लागलीय.

या कलेबाबत, उद्योगाबाबत शासनाला आस्था आहे. तशी दृष्टी आहे. ही दृष्टी मोठ्या प्रमाणात कै. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे होती. साहित्य, नाटक, सिनेमा कलेच्या हिताचा त्यांनी विचार केला. आपल्या हाती असलेल्या सत्तेला कलावंतांच्या मदतीची संधी मानून त्यांनी अनेक योजना मांडल्या. मात्र हे उपक्रम ज्यांच्याकडे सोपवले त्या लोकांच्या विचारांचा प्रभाव त्या मदतीच्या निकषाच्या मागे राहिला, त्यामुळे या प्रयत्नांत उणिंवा राहिल्या. एकांगी विचारसरणीने चांगली मूल्य असलेली कथानकंही दुर्लक्षित राहिली.

दक्षिणेमध्ये त्यांची इंडस्ट्री मजबूत आहे, त्यात एकी आहे. विकासाचे चित्र आहे. तशी एकी आपल्याकडे नाही. आपल्याकडे कोल्हापुरात चित्रनगरी आहे, निर्माते आहेत, मदतीत शासन कमी पडलेले नाही. मात्र शासनाने नेमलेल्या माणसांचा वकूब काय, त्यांनी किती स्वार्थ साधला? कुणाला मदत करायची? याची निस्पृह अंमलबजावणी झालीय असं वाटत नाही. शासनाच्या प्रयत्नातून ऊर्जा मिळाली पाहिजे, ती मिळू शकली नाही.

दोन उदाहरणं देतो.. भालजींचा स्टुडिओ जळला तेव्हा त्यांनी कच न खाता पुन्हा चित्रपट करीत म्हणून काम सुरू केले. ४८ पासून ७० पर्यंत भालजी आपल्यापरीने कार्यशील होते.

शांतारामबापूंसारखा माणूस, 'इये मराठीचिये नगरी' चित्रपटाला प्रेक्षकांचा काही प्रतिसाद मिळत नाही हे पाहून मागे फिरले नाहीत त्यांनी पुन्हा दुसऱ्या चित्रपटाची तयारी सुरू केली. व्यवसायाशी प्रामाणिक निष्ठा त्यांच्याकडे होती. तशीच चिकाटी सगळ्यांकडेच असते असे नाही. निष्ठावान गुणवंत लोकांच्या मागे उभे रहाणे, त्यांना बळ देणे त्यांच्या क्षमतेचा उपयोग योग्य प्रकारे या व्यवसायाच्या सुदृढीकरणासाठी करणे हे सरकारचं काम आहे.

शासकीय यंत्रणेवर शासनाचं नियंत्रण असावंच लागतं. यशवंतरावांनी खूप मोकळेपणाने या क्षेत्रासाठी काम केले त्यांच्याकडे ती दृष्टी होती. त्यांच्यानंतरच्या काळात मात्र त्या दृष्टीचा अभाव निश्चितच जाणवतो. या क्षेत्राचं भलं करणे आणि त्यासाठी दूरदृष्टीने



योजना आखणं महत्त्वाचं.

महाराष्ट्राच्या राज्य पुरस्काराचं हे पन्नासावं वर्ष आहे. पुरस्काराचे प्रोत्साहन, थोडीफार प्रतिष्ठा मिळते. ज्यांना पुरस्कार मिळतो त्यांचा उत्साह अधिक वाढतो. पण नुसते प्रोत्साहन देण्याने त्या व्यक्तींच्या मागे शासन आहे असा होत नाही. ज्यांच्यात वैयक्तिक ताकद आहे अशी माणसं हेरून त्यांच्या करवी काही चांगली कामे करवून घेतल्यास नक्कीच या क्षेत्रात चांगले परिणाम दिसून येतील.

*(शब्दांकन-शीतल करदेकर)*

# मी रंगभवन, धोबीतलाव...

दिलीप ठाकूर

मी 'रंगभवन, धोबीतलाव, मुंबई-४०० ००२.

बरीच वर्षे मी ३० एप्रिल, सायंकाळी सात वाजता या क्षणाची वाट पाहिली.

हा दिवस म्हणजे, भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक धुंडीराज गोविंद फाळके अर्थात दादासाहेब फाळके यांचा जन्मदिवस व त्याच दिवसाचा योग साधून माझ्या वास्तूत महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा साजरा होत असे..मी आठवणीत गेल्याचा सूर आला का? होय, तुम्ही जे ऐकलंय ते बरोबर आहे. गेल्या काही वर्षापासून हा 'राज्य चित्रपट महोत्सव पारितोषिक वितरण सोहळा' इतरत्र रंगू लागला आहे, पण बरीच वर्षे तो याच रंगभवनाच्या वास्तूत रंगत असे. १९६२ साली पहिल्या वर्षी लिबर्टी चित्रपटगृहात तो रंगला तेव्हा चित्रपती व्ही. शांताराम सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होते.

रंगभवन व मराठी चित्रपट महोत्सव पुरस्कार वितरण सोहळा हे १९६३ सालापासूनचे प्रत्येक वर्षाचे घनिष्ठ नाते. त्याच्या किती तरी आठवणी आहेत. आशा-निराशेचा-स्वप्न-सत्याचा खेळ आहे.

माझी ही वास्तू म्हणजे 'ओपन एअर थिएटर'. अर्थात छप्पर नसलेली वास्तू, मराठी नाटकांचे 'प्रयोग' येथे रंगत. तो वैभवशाली इतिहास एक वेगळा विषय ठरावा. मोकळी खेळती हवा व खूपच

मोकळे वातावरण यामुळे येथील स्टेजवरील सादरीकरण आणि त्याच्यासाठी रसिकांचे एकरूप होणे याला एक वेगळा 'फील'येतो. तो शब्दबद्ध करता येत नाही.

'ओपन एअर थिएटर' ही कल्पना व वस्तुस्थितीच वेगळी आहे.

अशा या वास्तूत मराठी चित्रपट पुरस्कार वितरणाचा सोहळा आयोजित होऊ लागला.

पहिले वर्ष, दुसरे वर्ष, तिसरे वर्ष असे करता करता मग 'हा पुरस्कार सोहळा म्हणजे रंगभवन' हे नाते दृढ होत गेले. इतके की, वर्षभर आपल्या कलाकृतीवर प्रामाणिकपणे मेहनत घेणारे चित्रकर्मी मग '३० एप्रिल ही तारीख आणि रंगभवन हे स्थळ'याची आतुरतेने व जणू हक्काने वाट पाहू लागले. मला विशेष अभिमान वाटावा अशीच ती 'गोष्ट' आहे. कारण, प्रत्येक वर्षी ३० एप्रिल रोजी येथे 'महाराष्ट्र राज्य शासनाचा मराठी चित्रपटासाठीचा 'मानाचा पुरस्कार' स्वीकारताना प्रत्येकाला विशेष अभिमान वाटायचा (आजही या पुरस्काराची विश्वासार्हता कायम असल्याने तो अजूनही वाटतो), 'यावर्षी पुरस्कार पटकावला तसाच तो पुढच्या वर्षीही असेच चांगले-दर्जेदार काम करून तो येथेच पटकावेन असे काहीजण विश्वास व्यक्त करत, तर असा 'मानाचा पुरस्कार' पटकावणाऱ्याच्या गुणवत्तेपासून विशेष प्रेरणा घेण्याची भावना बाळगतच प्रेक्षकातील उपस्थित चित्रकर्मी मनापासून टाळ्या वाजवत दाद देत. या वास्तूत मिळणाऱ्या टाळ्या आजूबाजूच्या वास्तूतील जागरूक नागरिकांपर्यन्त पोहचत व त्यांनाही येथे राज्य चित्रपट महोत्सव पुरस्कार वाटप सोहळा थाटात सुरू आहे याची जाणीव होई.

अशा या सोहळ्याची बराच काळ पठडी अथवा चौकट ठरली होती, तरी त्याबाबत कोणाचीच तक्रार नव्हती,

साधारण होळीचा सण झाल्यावर या राज्य चित्रपट महोत्सवातील सर्व विजेत्यांची नावे जाहीर होत. या निकालाबाबत कमालीची विश्वासार्हता असल्याने मराठी चित्रपट रसिक, चित्रपटसृष्टी व प्रसार माध्यमे यांची कधीच तक्रार नसे. सगळेच, ३० एप्रिल ही हुकमी तारीख व सायंकाळी सात ही वेळ



याची वाट पहात... १९९३ साली या 'निकाल पद्धती'त बदल झाला, आता 'नामांकन पद्धत' सुरू झाली. आणि पारितोषिकांतदेखील वाढ झाली. दोन्हीमुळे सोहळ्याची उपस्थिती, रंगत व उत्सुकता वाढली. ती उत्तरोत्तर वाढतच आहे, हे महत्त्वाचे.

मराठी चित्रपटाच्या पुरस्कार वितरणाचा हा सोहळा मराठी संस्कृती, परंपरा, मूल्ये, सभ्यता यांची जपणूक करणारा असतो हे आवर्जून नमूद करायला हवेच. नृत्य विनोदाचे काही कार्यक्रम, विजेत्यांना विशेष पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार वाटप आणि राज्य शासनाच्या वतीने मन:पूर्वक व मनसोक्त शुभेच्छा असा हा सोहळा. बऱ्याचदा तात्कालीन मुख्यमंत्र्यांनी हजर राहून मराठी चित्रपटसृष्टीला भरभरून सदिच्छा दिल्या. मराठी चित्रपटसृष्टीच्या हितासाठी काही शासकीय योजना जाहीर केल्या. पुरस्कार वितरणाच्या प्रत्येक सोहळ्याला राज्य सांस्कृतिक मंत्री हजर असतात. त्या प्रत्येकाने मराठी चित्रपटसृष्टीची उमेद व उत्साह वाढवला. या सोहळ्यातून जाहीरपणे दिलेली आश्वासने पूर्ण केली. बऱ्याचदा इतरही खात्यांच्या मान्यवर मंत्र्यांची या सोहळ्याला उपस्थिती लाभते, प्रत्येकाची 'चित्रपट' कलेबद्दलची आवड व बांधिलकी नेहमीच व्यक्त होते. शासनाच्या वतीने होणारा हा सोहळा एकाद्या विशिष्ट चौकटीत घडवला नाही अथवा अडकला नाही. तर नेहमीच तो रंगतदार ठरला...

रंगभवनमधील सोहळ्याच्या माझ्याकडील



आठवणीचा खूप मोठा खजिना आहे, त्यातील काही 'विशेष आठवणी' तुम्हाला सांगायलाच हव्यात.

एका सोहळ्यासाठी दक्षिणेचा सुपर स्टार कमल हासन प्रमुख पाहुणा म्हणून हजर होता. 'शुद्ध व स्वच्छ मराठी भाषे'त उत्तरोत्तर रंगत जाणाऱ्या या सोहळ्याचा कमल हासन 'भाषेच्या अडचणी'मुळे कसा बरे आनंद घेत असेल असा उपस्थितांना प्रश्न पडला. कमल हासन मात्र अत्यंत शांतपणे हा कार्यक्रम पहात बसला. कुठेही जराही कंटाळला नाही. खऱ्या कलाकाराकडून मिळणारी ही दाद होती.

अखेर त्याच्या 'सदिच्छापर भाषणा'ची वेळ येताच निवेदिका त्याला जाहीरपणे म्हणाली, हिंदी भाषण जमत नसेल तर इंग्रजीत केले तरी चालेल.. कमल हसनने निवेदिकेवर एक कटाक्ष टाकला, माईक हाती घेतला, श्रोतृवर्गात कमालीची शांतता व उत्सुकता. कमल हासनचे मोठेपण व अष्टपैलूत्व पाहता ही उत्सुकता अत्यंत स्वाभाविक होती. कमल हासनने सभोवार नजर टाकली, त्याच्या त्या 'पाहण्यातून' त्याने जणू सगळ्या उपस्थितांना जिंकले... किंचितसा वेळ असाच गेला व कमल हासन अत्यंत शांतपणे, हळूहळू व विचारपूर्व मराठीत बोलू लागला. क्षणभर शंका आली, हे तर कसदार अभिनेत्याचे लक्षण आहे, बहुधा त्याचे पाठांतर चांगले असावे (त्यात चूक ते काय हो?) तेवढ्यात त्यानेच खुलासा केला, काही वर्षे जळगावात राहिलो तेव्हा मराठीशी थोडीफार ओळख झाली. तो अत्यंत नम्रपणे बोलत असताना मराठी रसिकांनी त्याला दाद देताना वाजवलेल्या टाळ्या आजही ऐकू येतात. कमल हासनने पुढचे भाषण 'क्लासिक' इंग्रजीत केल्याबद्दल कशाला हो कोण तक्रार करतोय?

'कमल हासन मराठीत बोलला' ही मराठी वृत्तपत्रासाठी 'चौकटीची बातमी' ठरली.

अशाच येथील एका राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्यात 'सुपर स्टार' राजेश खन्ना प्रचंड भावूक झाल्याचे अगदी याक्षणी जसेच्या तसे आठवत आहे.

आपल्या सत्काराला भावपूर्ण उत्तर देताना काका अर्थातच राजेश खन्ना 'फ्लॅशबॅक' मध्ये गेला, त्याला 'आराधना', 'अमर प्रेम', 'आनंद', 'कटी पतंग' चे दिवस आठवले. अशातच तो म्हणाला, वो भी एक दिन था, यह भी एक दिन है, कल कोई और था आज कोई और है... राजेश खन्ना मूळचा आमच्या गिरगावचा! ठाकूरद्वार नाक्यावरील पार्वती निवासचा रहिवाशी. त्यामुळे त्याला मराठी चांगले बोलता येते, त्याला गिरगावपासून धोबीतलाव खूप जवळ असल्याची कल्पना होतीच, त्यामुळे हिंदीतून बोलता बोलता तो मराठीतही बोलू लागला.

राज्य चित्रपट महोत्सवातील येथील अशा आठवणी खूप.

सर्वोत्कृष्ट अभिनेत्याच्या पुरस्कारासाठी एका वर्षी 'आपली माणसं'चा अशोक सराफ व 'एक होता विदूषक'चा लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यात कमालीची चुरस होती. अशोक सराफ अष्टपैलू अभिनेता म्हणून परिचित आहे, 'लक्ष्या'वर मात्र 'विनोदवीर' असा शिक्का बसला पण 'विनोदवीराचे' सर्वात मोठे दुःख म्हणजे त्याला कोणीही गंभीरपणे घेत नाहीत' (विनोद करणे हा खूप सोपा व हलका असा अभिनय प्रकार मानला जातो.) लक्ष्याला हा समज खोडून काढायचा होता. राज्य चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार प्राप्त झाल्याने आपल्याला प्रतिष्ठा लाभेल असा लक्ष्याला विश्वास होता. सोहळा एकेक पारितोषिक देत देत पुढे सरकला. आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्यांची नामांकने जाहीर झाली. एव्हाना उत्कंठा शिगेला पोहोचली नि नाव जाहीर झाले, सर्वोत्कृष्ट अभिनेता अशोक सराफ. चित्रपट 'आपली माणसं'. 'बहुरुपी' अशोक सराफने पुरस्कार स्वीकारला, पण स्टेजवरून तो उतरून आपल्या जागेवर

पोहोचण्यापूर्वीच लक्ष्याने पुढे होत अशोक सराफचे अभिनंदन केले. आपल्याला पुरस्कार न मिळाल्याची कोणतीही कटुता त्याने आपल्या मनात बाळगली नाही. 'खरा कलाकार' अशा क्षणातूनही दिसतो.

या वास्तूत या महोत्सवातून असे किती तरी लहान-मोठे भावुक प्रसंग घडले.

जब्बार पटेल दिग्दर्शित 'मुक्ता'च्या दर्जेदार अभिनयासाठी सोनाली कुलकर्णीला लाभलेला पुरस्कार एका वेगळ्या कारणासाठी लक्षात आहे. त्यावेळी अनुभवी अभिनेत्रींच्या स्पर्धेत नवीन पिढीतील सोनालीने पुरस्कार पटकावला होता. त्यामुळे या सोहळ्यात अनेकांच्या भुवया उंचावल्या व सोनाली कुलकर्णीच्या रूपाने एक दर्जेदार अभिनेत्री लाभलीय असा विश्वास व्यक्त झाला. पुढे तो केवढा तरी खरा ठरला. 'मुक्ता'साठीचा पुरस्कार घेवुन सोनाली आपल्या मामासोबत रात्री घरी निघाली, छत्रपती शिवाजी टर्मिनस मधून त्यांनी लोकल ट्रेनने विक्रोळीला जाण्याचा प्रवास सुरू केला. 'मानाचा पुरस्कार' अभिमानाने हाती बाळगत एक मराठी अभिनेत्री जनसामान्यांप्रमाणे प्रवास करतेय हे एका वृत्तपत्र छायाचित्रकाराच्या 'नजरे'त पडले, त्याने 'कॅमेरा' काढलादेखील. दुसऱ्या दिवशीच्या 'सांज लोकसत्ता' मध्ये ही पहिल्या पानाची 'छायाचित्र बातमी' ठरली.

तात्पर्य, राज्य चित्रपट महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा फक्त घडून जातो असे नव्हे तर त्यातून किती तरी छोट्या-मोठ्या गोष्टी जन्माला येतात, त्या या अशा.

बराच काळ हा सोहळा या वास्तूत म्हणजे रंगभवन येथे रंगला व त्यातून एक विश्वासाचे दृढ नाते विणले गेले. येथे पुरस्कार स्वीकारलेल्या प्रत्येक कलाकाराची आपली एक विशेष आठवण असेलच.

कालांतराने मराठी चित्रपटसृष्टीच्या यशाची पताका राज्यातील अन्य शहरातूनही फडकावी अशा सद्हेतूने हा सोहळा राज्यातील अन्य शहरात थाटात साजरा होऊ लागला. पुणे-नाशिक-कोल्हापूर-अकोला अशा विविध शहरात. त्याचे आयोजन होऊ लागले, त्यानंतर पुन्हा मुंबईत तो आयोजित करताना दोन वर्षे त्याचा मान गेटवे ऑफ इंडिया या पर्यटन स्थळाला मिळाला, गेल्या वर्षी वांद्रा-कुर्ला संकुलातील मोकळ्या जागेत खुलला-फुलला. अशा प्रकारच्या पुरस्कार सोहळ्याला बदलत्या काळासोबत रुपेरी-चंदेरी चकाकी, झळाळी या राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्यालाही काही प्रमाणात प्राप्त होणे गरजेचे होतेच, अन्यथा 'हा सोहळा काळासोबत बदलला नाही' असा आरोप व्हायचा.

या सगळ्या नव्या प्रवाहात व त्यासह आलेल्या नव्या बदलात अनेक जाणकारांच्या तोंडी एक प्रतिक्रिया हमखास येते, राज्य चित्रपट पुरस्काराच्या पारितोषिक वितरण सोहळा म्हटलं की, धोबीतलावचे



रंगभवन पटकन आठवते. बराच काळ तेथील सोहळा खूप साधेपणाने-घरगुती-कौटुंबिक रूपात पार पडे, पण त्यात कमालीचा जिव्हाळा व खरेपण जाणवे, हा त्या वस्तूचा परिणाम व प्रभाव असावा. चित्रपटसृष्टीच्या किमान दोन पिढ्यांची ही भावना आहे. जाणकारच अशी भावना व्यक्त करतात म्हटल्यावर त्यावर मी आणखी काही बोलणे गरजेचे आहे का? तसे बोलणे योग्य ठरणार आहे का?

राज्य चित्रपट पुरस्कार वितरण सोहळ्याच्या यशस्वी आयोजन व परंपरा यामध्ये माझा म्हणजे रंगभवनाचा विशेष सहभाग आहे, याचा विशेष अभिमान व आपुलकी आहे.

# शासनाच्या योजनेमुळे चित्रपटसृष्टीची प्रगती

प्रसाद सुर्वे
अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ

भारतीय चित्रपटांच्या शताब्दी वर्षातील, महाराष्ट्र राज्याच्या चित्रपट महोत्सवाच्या पन्नासाव्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाकडून अनेक हार्दिक शुभेच्छा!

महाराष्ट्र शासन मराठी चित्रपट व्यवसायाच्या विकासासाठी नेहमीच प्रयत्नशील असते आणि शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून मराठी चित्रपट व्यवसायाच्या प्रगतीसाठी कालानुरूप ज्या विविध योजना राबवल्या जातात. त्यामुळेच आज आमचा मराठी चित्रपट व्यवसाय अत्यंत भरभराटीला आला आहे विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या अनुदान योजनेमुळेच मराठी चित्रपट व्यवसाय मोठ्या ताकदीने उभा राहिला आहे. चित्रपट महोत्सवाच्या पारितोषिकांचा रकमेमध्येही भरघोस वाढ केली आहे. त्यामुळे या महोत्सवात सहभागी होण्यासाठी मोठा उत्साह निर्माण झाला आहे. त्याबद्दल अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ अत्यंत कृतज्ञ आहे.

या योजना राबवताना सांस्कृतिक विभाग नेहमीच आमच्या महामंडळाला विश्वासात घेत असतो आणि त्यांना लागेल ते सहकार्य देण्यात आम्हाला मोठी धन्यता वाटत असते.

आज अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ म्हणजे महाराष्ट्र शासन आणि मराठी चित्रपट व्यवसाय यांच्यामधील एक समर्थ दुवा झाले आहे. आणि याबद्दल महामंडळाला सार्थ अभिमान वाटत आहे.

मराठी चित्रपट व्यवसायाला महाराष्ट्र शासनाचे नेहमीच अनेक प्रकारे साहाय्य होत असते आणि त्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. पृथ्वीराजजी चव्हाण, उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार आणि सांस्कृतिक कार्यमंत्री मा. ना. श्री. संजय देवताळेसाहेब आणि सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री मा. ना. सी. फौजिया  खान यांचे मंडळ यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत!

या पारितोषिक वितरण सोहळ्यास आमच्या अनेक हार्दिक शुभेच्छा!

# राज्य पुरस्काराचे श्रेष्ठत्व निर्विवाद!

सतीश रणदिवे

महाराष्ट्र राज्याच्या कला-परंपरेचा मंगल कलश हाती घेऊन उभ्या असलेल्या मराठमोळ्या युवतीची प्रतिकृती असलेले शासनाचे चित्रपट पारितोषिकाचे हे देखणे सन्मानचिन्ह, कोल्हापूरात गीतकार जगदिश खेबुडकर आणि दिग्दर्शक वसंत पेन्टर यांचे घरी, या व्यवसायातील माझ्या उमेदवारीच्या काळात मी प्रथमच पाहिले. मोठ्या दिमाखात विराजमान असलेली पाच-पाच सन्मानचिन्हं पाहून मी थक्क झालो. या कर्तृत्वाच्या जवळपास जाणारं थोडंफार तरी कर्तृत्व आपल्या हातून घडेल का याची स्वप्नचित्रं माझ्या मनाच्या पडद्यावर अवतरू लागली. आणि त्यातच कलामहर्षी बाबुराव पेन्टर, व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर, दामले-फत्तेलाल, मा. विनायक, दत्ता धर्माधिकारी, दिनकर द. पाटील, अनंत माने, अशा आपल्या कोल्हापुरातील सिनेकर्मींच्या नावांची 'मोहर'या विविध पारितोषिकावर आहे हे समजताच याचा आनंद व सार्थ अभिमान वाटणं माझ्यासारख्या कोल्हापुरी तरुणाला स्वाभाविकच होतं. त्याचबरोबर कोल्हापूरच्या या कलेचा वारसा टिकवण्याच्या कार्यात आपलाही खारीचा वाटा असावा ही जबाबदारीची जाणीव मला गप्प बसू देईना. मी जोमाने कामाला लागलो आणि सुदैवाने पुढील चार-पाच वर्षातच 'बहुरुपी'या माझ्या पहिल्या चित्रपटास दिग्दर्शनासह चार पारितोषिकं शासनातर्फे जाहीर झाली.

कोल्हापूरातील सर्व वृत्तपत्रांनी ठळक स्वरूपात मुखपृष्ठावर बातमी झळकवली. कोल्हापूरातील छोटी मोठी मंडळं, तालीम संस्था घरी सत्काराचा निरोप घेऊन येऊ लागल्या. त्याच वातावरण निर्मितीने कोल्हापूर सिने पत्रकार संघाची स्थापना झाली आणि त्यांनी घरी येऊन हस्तलिखित मानपत्रही दिलं. पुण्या-मुंबईच्या वृत्तपत्रातून फोटोसह मुलाखती छापून आल्या. आपल्या इवल्याश्या कला-कर्तृत्वानी उंच गुढी महाराष्ट्राच्या कला-तारांगणात उभी केल्याचा आनंद त्यावेळी मला झाला. चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांच्या जन्मदिनी म्हणजे ३० एप्रिल रोजी मुंबईत हा पारितोषिक वितरण समारंभ होणार हे कळल्यावर माझ्या आनंदाला पारावारच राहिला नाही. कारण तो दिवस माझाही जन्मदिवस असल्याने मला वाढदिवसाची ती मोठी गिफ्ट होती. केवळ योगायोगाने चित्रपट जनकाचा हा जन्मदिन आपल्याही वाट्याला आल्याने, चित्रपट माध्यमाच्या जबाबदारीची अधिक जाणीव माझ्या तरुण, भाबड्या मनाने निदान त्यावेळी तरी करून दिली. या समारंभाच्या निमित्ताने प्रथमच मुख्यमंत्री, सांस्कृतिक मंत्री यांना जवळून पाहणं, त्यांच्याशी हस्तांदोलन करणं याचं अप्रूप-त्यावेळी खूप काही वेगळं वाटून गेलं. शासनाच्या या कार्यक्रमानंतर तीन-चार दिवसांतच कोडॅक फिल्म कंपनीतर्फे शासन पात्र पारितोषिक विजेत्यांचा शाही सत्कार मुंबईतील मोठ्या हॉटेलमध्ये अगोदर ठरलेला असायचाच. हा समारंभ संपल्यानंतर कोल्हापूरला निघण्यासाठी मी मुंबई सेंट्रलला रात्री जरा उशिराच पोहोचलो. कोल्हापूरच्या सर्व एस.टी.गाड्या निघून गेल्या होत्या. खिशाच्या सल्ल्यानुसार मला परत हॉटेलला रहायला जाणंही शक्य नव्हतं. उशाला सामानाची शबनम बॅग आणि कुशीत, रुमालाच्या आवरणातली पारितोषिकाची बाहुली घेऊन सिनेमाची मोठी स्वप्ने रंगवत स्टॅण्डवरच्या बाकड्यावर आडवे होऊन काढलेली ती रात्र मला चांगलीच स्मरणात आहे.

आजकाल बऱ्याच खाजगी संस्थांतर्फे किंवा खाजगी उपग्रह वाहिन्यांतर्फे पुरस्कार देण्यात येत असले तरी शासनाचे पारितोषिक हे प्रत्येकाला अधिक भूषणावह वाटते. कारण त्यात राजमान्यतेसह रसिकमान्यताही आहे. राज्य पुरस्कार हे सर्व पुरस्कारांत श्रेष्ठ दर्जाचे गणले जातात, ही वस्तुस्थिती कोणीही नाकारू शकत नाही.

माझ्या चित्रपट व्यवसायाच्या पंचवीस-तीस वर्षांच्या कारकीर्दीत मी केलेल्या बऱ्या वाईट चित्रपटांची नोंद घेऊन पारितोषिक रूपात सहा बाहुल्या माझ्या घरी विराजमान झाल्या आहेत. घरी आलेली कोणत्याही क्षेत्रातील दिग्गज व्यक्ती जेंव्हा त्या पाहते, तेव्हा त्यांच्या नजरेत माझ्याबद्दलचा आदर सन्मान कितीतरी पटीने वाढलेला मी अनुभवतो. आणि शासन पारितोषिक विजेत्या प्रत्येकाला हा प्रत्यय येत असणार हे नक्की. आयुष्यातील अनमोल ठेवा ह्या भावनेने या सन्मान चिन्हाचा आदर प्रत्येक विजेता करत असतो. त्याच बरोबर सांस्कृतिक कार्य संचनालयाच्या कार्याबद्दल कृतज्ञता ही मनोमनी व्यक्त करीत असतो.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मराठी चित्रपटाच्या सृजनशीलतेची पताका नव्या दिग्दर्शक निर्मात्यांनी फडकवली आहे. चित्रपट भव्यदिव्य स्वरूपात करण्यासाठी वेगवेगळे प्रयोग होत आहेत. मराठी चित्रपट पुरस्काराची सुवर्ण महोत्सवी वाटचाल आणि भारतीय चित्रपटाची शतक महोत्सवी वाटचाल हा योग यंदा जुळून आला आहे. सुवर्ण महोत्सवी पारितोषिक समारंभास माझ्या शुभेच्छा.

# ‘श्वास’नंतरचा मराठी सिनेमा

संतोष पाठारे

‘आशया’च्या भांडवलावर स्वत:चं वेगळेपण जपणारा मराठी सिनेमा आज स्थित्यंतराच्या एका अनोख्या वळणावर उभा आहे. हे स्थित्यंतर ‘आशया’ बरोबरीनेच तंत्र, जाहिरात, प्रेक्षक प्रतिसाद या सर्वच पातळ्यांवरील आहे. २००४ साली प्रदर्शित झालेल्या संदीप सावंत दिग्दर्शित ‘श्वास’या चित्रपटाने या स्थित्यांतराला ठळकपणे जगापुढे मांडलं तरीही या स्थित्यंतराची सुरुवात त्याआधीच झालेली होती.

सत्तरच्या दशकात बंगाली व हिंदी चित्रपटसृष्टीत जोमाने आलेल्या समांतर चळवळीचा हलकासा परिणाम मराठी चित्रपटांवर पडला. त्यातही महाराष्ट्रातील सशक्त नाट्य चळवळीतून आलेल्या सत्यदेव दुबे, डॉ. जब्बार पटेल, अमोल पालेकर यांनी ‘शांतता कोर्ट सुरू आहे.’, ‘सामना’, ‘सिंहासन’, ‘उंबरठा’, ‘आक्रित’ यासारख्या चित्रपटांद्वारे मराठी चित्रपटांना ‘वास्तववादी’ चेहरा देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या प्रयत्नात जयू व नचिकेत पटवर्धन, अरुण खोपकर, सुमित्रा भावे, सुनील सुकथनकर यांनी प्रेक्षकशरण न होता, चित्रपट माध्यमाच्या सर्व शक्यता तपासत, त्यांना अपेक्षित असलेला आशय चित्रपटातून मांडून आपला वाटा उचलला. याच दरम्यान स्मिता तळवळकरांसारख्या निर्मातीने व्यावसायिक चौकट न मोडता ‘मास’ आणि ‘क्लास’लाही भावतील अशा कथा ‘कळत नकळत’,



'तू तिथं मी', 'चौकट राजा', 'सवत माझी लाडकी' यासारख्या चित्रपटांतून सादर केल्या. 'धुमधडाका', 'नवरी मिळे नवऱ्याला' या चित्रपटांच्या यशामुळे मराठी चित्रपट म्हणजे विनोदी चित्रपट हे नवं समीकरण रुजत असताना व त्यामुळे चित्रपटांतून आशयाच्या अनेक शक्यता अपेक्षित करणारा सुजाण प्रेक्षक मराठी चित्रपटांपासून काहीसा दूर होत असताना त्या काळात प्रदर्शित झालेल्या 'कैरी', 'दहावी फ', 'वास्तुपुरुष' यासारख्या चित्रपटांनी मराठी चित्रपटांच्या स्थित्यंतराची एक आश्वासक सुरुवात केली.

संदीप सावंतयांच्या 'श्वास'ने मराठी चित्रपटसृष्टीला नवसंजिवनी दिली. जागतिक व इतर प्रादेशिक चित्रपट प्रक्षेपित करणाऱ्या दूरचित्रवाणीच्या वाहिन्या, फिल्म सोसायटी चळवळ व त्याच्याद्वारे आयोजित केले जाणारे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यामुळे जगभरातील उत्तम दर्जाचा चित्रपट प्रेक्षकांपर्यंत सहज पोहोचू लागला. स्वाभाविकच चित्रपट म्हणजे केवळ प्रेक्षकांना हसवून किंवा रडवून केलेलं मनोरंजन, एवढीच त्याची मर्यादा नसल्याची जाणीव अधिक तीव्र झाली. ज्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय चित्रपट पाहून प्रेक्षकांच्या अपेक्षा उंचावल्या त्याचप्रमाणे आपणही अशा प्रकारचा चित्रपट आपल्या मराठी प्रेक्षकांसाठी का निर्माण करू नये, असा स्वाभाविक प्रश्न चित्रपटकर्त्यांना पडला. साधी कथा कलात्मक रीतीने पडद्यावर मांडल्यास ती प्रेक्षकांना थेट भिडते हा इराणी चित्रपटांनी दिलेला धडा लक्षात घेऊन मंगेश हाडवळेने 'टिंग्या' व नितीन नंदन ने 'झिंग चिक झिंग'ची निर्मिती केली. या चित्रपटांच्या निर्मितीमागील आंतरराष्ट्रीय चित्रपटांची प्रेरणा सहज लक्षात येते. मुद्दा असा की चाकोरीत अडकलेल्या मराठी चित्रपटांना बाहेर काढण्याचं काम संदीप सावंतच्या 'श्वास'नं केलं. मात्र या कथेचं दिग्दर्शकाने केलेलं सादरीकरण मराठी चित्रपटांसाठी नावीन्यपूर्ण होतं. संवादापेक्षा दृश्यात्मकतेवर दिग्दर्शकाने दिलेला भर, अनावश्यक गाणी व चित्रपटाचा गंभीर मूड हलका करण्यासाठी पेरलेले विनोद यांना काट देऊन कथेचं गोळीबंद चित्रण हा 'श्वास'चा प्लस पॉईंट ठरला.

लोकप्रियतेबरोबर 'श्वास'वर राजमान्यतेचीही मोहोर उमटली. आचार्य अत्रेंच्या 'श्यामची आई'नंतर तब्बल पन्नास वर्षांनी 'श्वास'मुळे मराठी चित्रपटाला सर्वोत्तम भारतीय चित्रपटाचं राष्ट्रीय पारितोषिक मिळालं व त्यावर कडी म्हणजे भारतातर्फे ऑस्करला पाठवण्यासाठी 'श्वास'ची अधिकृत निवड करण्यात आली. 'श्वास'ने केलेली ही कमाई मराठी तसेच मराठीतर प्रेक्षकवर्ग आणि इतर चित्रपटसृष्टीतील कलावंत, तंत्रज्ञ याचं मराठी चित्रपटांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी कारणीभूत ठरली. आपण कथेशी प्रामाणिक राहून, केवळ व्यावसायिक गणितांचा विचार न करता चित्रपट निर्मिती केली तर त्याला उत्तम प्रतिसाद मिळतो हा विश्वास 'श्वास'ने नवोदित दिग्दर्शकांमध्ये निर्माण केला. अर्थात केवळ अशा प्रकारचं वातावरण निर्माण होणं पुरेसं नसतं तर अशा पूरक वातावरणाचा फायदा घेऊन सातत्य राखणं हे अत्यंत गरजेचं असतं. 'श्वास'नंतर आलेल्या मराठी चित्रपटांनी व ते निर्माण करणाऱ्या दिग्दर्शकांनी ते सिद्ध करून दाखवलं. 'श्वास' पाठोपाठ २००५ साली प्रदर्शित झालेल्या 'डोंबिवली फास्ट'या निशिकांत कामत दिग्दर्शित चित्रपटाने मराठी चित्रपटांमध्ये येऊ घातलेल्या बदलांवर शिक्कामोर्तब केलं. रोजचं आयुष्य जगताना येणाऱ्या समस्या, अवती-भवती सुरू असलेला भ्रष्टाचार, समाजातील अनागोंदी व्यवहार व यामुळे नैराश्य आलेला एक

सामान्य माणूस कोणती पातळी गाठतो त्याचं थरारक चित्रण असलेला 'डोंबिवली फास्ट' कल्पित असला तरी सामान्य माणसाच्या मनातील फॅण्टसी व्यक्त करणारा होता. स्वाभाविकच प्रेक्षकांनी तो उचलून धरला. त्यानंतर आलेल्या अनेक मराठी चित्रपटांतून सामान्य माणूस व त्याचं जगणं अप्रतिमरीत्या चित्रित केलं गेलं.

चित्रपटाला वास्तवाची जोड द्यायची, त्याची कलात्मक हाताळणी करायची तर दिग्दर्शक संवेदनशील हवाच, त्याच बरोबरीने त्याची चित्रपट माध्यमावरदेखील हुकूमत असायला हवी. गेल्या दशकात मराठी चित्रपटसृष्टीत असे दिग्दर्शक उदयाला आले. या दिग्दर्शकांनी एफटीआयआय किंवा इतर चित्रपट तंत्रज्ञान शिकवणाऱ्या संस्थांमधून प्रशिक्षण घेतलं व मराठीत चित्रपट निर्माण करण्याचा आग्रह धरला. उमेश कुलकर्णी, सचिन कुंडलकर, सुजय डहाके ही त्यापैकी काही प्रमुख नावं.

सचिन कुंडलकरने 'रेस्टॉरंट', 'निरोप', 'गंध' यासारख्या चित्रपटांतून आशयघन कथांची मांडणी अत्यंत तरलपणे चित्रित केल्याचं लक्षात येतं. तीन लघुकथांना एका सूत्रात गुंफून निर्माण केलेला 'गंध' हा चित्रपट केवळ सचिन कुंडलकरच्याच नव्हे तर एकूणच मराठी चित्रपट सृष्टीतील एक उल्लेखनीय प्रयोग आहे.

एफटीआयआयमधून चित्रपट दिग्दर्शनाचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन आलेल्या उमेश कुलकर्णीने 'वळू'सारख्या मराठी चित्रपटाशी इमान राखणारा चित्रपट निर्माण केला. बोजड कलाविष्काराऐवजी उपहासात्मक विनोदाचा आधार घेत विविध स्वभावाचा अर्क असणाऱ्या व्यक्तिरेखा या उमेश कुलकर्णींच्या 'वळू', 'देऊळ'या चित्रपटांची वैशिष्ट्ये आहेत. त्याच्या 'विहीर'च्या निमित्ताने जया बच्चन यांनी मराठीत चित्रपट निर्मिती सुरू केली. मराठी चित्रपट निर्मितीत कॉर्पोरेट कंपन्यांनी रस दाखवायला सुरुवात केली. याचं श्रेय 'विहीर'ला देता येईल. कमीतकमी खर्चात निर्माण होणारा, सरकारी अनुदानावर अवलंबून असणारा मराठी चित्रपट 'विहीर'नंतर बिग बजेट झाला. याचवेळी झी टॉकीज या वाहिनीने चित्रपट निर्मितीत उतरून 'साडे माडे तीन' या



चित्रपटाची निर्मिती केली. जितकी उत्तम जाहिरात तितका अधिक प्रेक्षकवर्ग हे 'साडे माडे तीन'च्या यशाने सिद्ध केलं.

उत्तम निर्मिती मूल्य असलेला चित्रपट पहायला प्रेक्षक चित्रपटगृहात येतात ही वस्तुस्थिती आहे. गेल्या दशकात उभी राहिलेली मल्टिप्लेक्सची शृंखला मराठी चित्रपट निर्मितीसाठी पूरक ठरली. मर्यादित आसनांच्या, सुखसोयींनी सज्ज असलेल्या थिएटरमध्ये जाऊन चित्रपटाचा आस्वाद घेण्याची मजा प्रेक्षक अनुभवू लागले.

सचिन कुंडलकर आणि उमेश कुलकर्णीप्रमाणेच नव्या कल्पना व नव्या उमेदीने जे दिग्दर्शक मराठीत आले त्यामध्ये परेश मोकाशी, सतीश मन्वर, राजीव पाटील, राजेश पिंजानी, सतीश राजवाडे, शिवाजी लोटण पाटील, रवी जाधव यांचा उल्लेख करणं अपरिहार्य आहे. या सर्व दिग्दर्शकांच्या पाठीशी रंगभूमीचा किंवा जाहिरात क्षेत्राचा अनुभव होता. स्वाभाविकच चित्रपट निर्मिती करताना या सर्वांनी आपल्या अनुभवाचा फायदा करून घेत मराठी चित्रपट सृष्टीत नवचैतन्य आणलं.

१९१३ साली ज्या दादासाहेब फाळकेंनी भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली त्यांच्या कार्यकर्तृत्वाला सलाम करणारा चित्रपट बनवण्याची कल्पना परेश मोकाशीला सुचली यासाठी त्याचं खास अभिनंदन करायला हवं. या सर्वच चित्रपटांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली. मराठी चित्रपट मराठी समाजाचं प्रतिबिंब दाखवतो आहे, मनोरंजनाच्या पलिकडे जाऊन माणसांच्या वेदना व



संवेदना हाताळतो आहे, असं चित्र या चित्रपटांनी निर्माण केलंय. राजीव पाटीलच्या 'जोगवा'मधूनही जोगत्या-जोगिणीच्या खडतर आयुष्याचं भेदक चित्रण आलं. मात्र या चित्रपटाला मिळालेल्या गीत, संगीत व सर्वोत्कृष्ट गायनाच्या पुरस्कारांमुळे मराठी चित्रपट संगीत हे सुश्राव्य असतं, हेदेखील अधोरेखित झालं. अजय-अतुल, अवधूत गुप्ते, निलेश मोहरीर, कौशल इनामदार ही तरुण संगीतकार मंडळी मराठी चित्रपटसृष्टीला संगीतमय करीत आहेत. गुरु ठाकूर, अश्विनी शेंडे यासारखे गीतकार व स्वप्निल बांदोडकर, उर्मिला धनगर, आरती अंकलीकर, वैशाली सामंत ही गायक मंडळी मराठी चित्रपट संगीतात मोलाची भर घालत आहेत. चित्रपटाच्या आशयानुसार येणारी गीते ही मराठी चित्रपट संगीताची खासियत पुन्हा एकदा अनुभवता येते आहे. 'नटरंग'मधील लावण्या, 'बालगंधर्व'मधील नाट्यपदे 'संहिता' मधील शास्त्रीय रागदारीवर आधारित गीते यांचा उल्लेख याबाबतीत करणे आवश्यक आहे.

मराठी चित्रपट आशयदृष्ट्या बहुविध झाला त्याप्रमाणे त्यात तांत्रिक सफाईदेखील आली. पूर्वी केवळ १६मि.मी.वर शूट होणारा मराठी चित्रपट सिनेमास्कोप झाला. तंत्राच्या मदतीने आशय अधिक उठावदार करता येतो हे मर्म जाणलेले छायाचित्रकार मराठीत जोरकसपणे काम करू लागले. अमलेन्दु चौधरी (गंध, हरिश्चंद्राची फॅक्टरी), महेश लिमये (बालगंधर्व, नटरंग), शैलेश अवस्थी (मी शिवाजीराजे भोसले बोलतोय), संजय मेमाणे (श्वास) संजय जाधव (रिंगा रिंगा, चेकमेट) या छायाचित्रकारांनी मराठी चित्रपटांना दृश्यकला बहाल केली. 'शाळा' या सुजय डहाकेच्या चित्रपटाचं छायाचित्रण परदेशी छायाचित्रकाराने केलं हे देखील विशेष! 'गजर'या चित्रपटाचं शूटिंग कॅनॉन ५डी कॅमेऱ्याने करून अमोल गोळे या तरुण छायाचित्रकाराने चित्रपट छायालेखनात एक वेगळीच क्रांती घडवून आणली. या कॅमेऱ्यांच्या वापरामुळे फिल्म मेकिंगचं तंत्र बदलून गेलं.

नवीन दिग्दर्शकांच्या मांदियाळीत जुन्या जाणत्या दिग्दर्शकांना देखील आपापल्या शैलीतले चित्रपट देऊन मराठी चित्रपटसृष्टीतला जिवंतपणा कायम ठेवला. सचिन पिळगांवकर, महेश कोठारेंनी विनोदी

बाजाचे चित्रपट दिले तर चंद्रकांत कुलकर्णी, गजेन्द्र अहिरेंनी आपल्या चित्रपटातून आशयाचं वैविध्य कायम राखलं. गेल्या दशकातील व्यावसायिकदृष्ट्या सर्वात यशस्वी मराठी दिग्दर्शक म्हणून महेश मांजरेकरांचा उल्लेख करायला हवा. 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' या त्यांच्या चित्रपटाने मराठी चित्रपटसृष्टीतील उत्पन्नाचे सर्व विक्रम मोडले. या चित्रटाला मिळालेल्या व्यावसायिक यशाने मराठी माणसाच्या जिव्हाळ्याचा विषय उत्तम पद्धतीने सादर केल्यास प्रेक्षकांच्या पसंतीची पावती मिळते असा विश्वास निर्माण झाला. त्यांच्या 'काकस्पर्श'ने देखील प्रेक्षकांची मने जिंकली.

महेश मांजरेकरांच्या या चित्रपटांना मिळालेल्या व्यावसायिक यशात प्रसिद्धी यंत्रणेचा व जाहिरातीचा सिंहाचा वाटा आहे. गेल्या दशकात मराठी चित्रपट केवळ पुणे, मुंबई, कोल्हापूर एवढ्याच टेरिटेरीत न राहता महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमध्ये नियमितपणे प्रदर्शित होऊ लागलाय. या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये चित्रपटाला प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याचे मार्गही वेगवेगळे आहेत. मोठमोठ्या होर्डिंगपासून बस व रिक्षांवरील बॅनर, दूरचित्रवाहिन्यांच्या जाहिरातीपासून एकदम रेडियोवरील जाहिराती, तसेच .. नेटवर्किंग साईट परिसंवाद, वर्तमानपत्रांतून प्रमोशन्स असे विविध मार्ग निर्मात्यांकडून अवलंबिले जाताहेत. तृप्ती भोईर यांच्या 'टूरिंग टॉकीज'चे प्रदर्शन मुंबई-पुण्यात तंबूमध्ये करण्यात आले. हादेखील चित्रपटाच्या प्रमोशनचा एक भाग होता. पूर्वी चाळीस लाखात निर्माण होणाऱ्या मराठी चित्रपटांचे चाळीस लाख रुपयांचं बजेट केवळ प्रमोशनसाठी असतं यावरून जाहिरातीचं महत्त्व व त्यामुळे प्रेक्षकसंख्येत झालेली वाढ लक्षात येते.

मराठी चित्रपटांच्या संख्येत गेल्या दहा वर्षात दुपटीने वाढ झाली आहे. सध्या दरवर्षी सुमारे ७५ मराठी चित्रपट प्रदर्शित होत आहेत. विनोदी, कौटुंबिक, सामाजिक आशयाच्या चित्रपटाचं सादरीकरण आधुनिक काळानुसार बदलतंय.

मराठी चित्रपट म्हणजे ग्रामीण चित्रपट हे समीकरण आता बदललंय 'इन्व्हेस्टमेंट', 'संहिता', 'प्रेमाची गोष्ट' यासारख्या चित्रपटातून शहरी,



आधुनिक संवेदनाचं चित्रणदेखील प्रभावीपणे होऊ लागलय. थिएटर्सची उपलब्धता, वितरणाची उत्तम व्यवस्था आणि प्रेक्षकांमध्ये थिएटरमध्ये येऊन आपला मराठी चित्रपट पाहण्याची ओढ निर्माण झाली तर मराठी चित्रपटसृष्टीत 'श्वास'नंतर निर्माण झालेलं चैतन्य कायम राहील!

# मराठी चित्रपटसृष्टी... एक मुक्त चिंतन..!

अशोक राणे

"माझा नवीन सिनेमा तुम्ही लिहिताय आणि बरं का, आपण जिमी जीप वापरणार आहोत, संपूर्ण सिनेमा डी. आय.करणार आहोत."

मला लेखक म्हणून साइन करायला आलेले निर्माते-दिग्दर्शक यांनी याच शब्दात माझ्यासमोर प्रस्ताव ठेवला. कथा कुठली, कोणाची, काय प्रकारची यातलं काही नाही. थेट हे असं. हा केवळ माझाच अनुभव नाही. आजकाल मराठी चित्रपटसृष्टीत जो उठतो तो अशी 'जिमी जीप, डी.आय'.ची भाषा बोलतो. प्रत्येकाला सर्रास असे वाटते कि गरज असो वा नसो आपण नवे तंत्रज्ञान वापरायलाच हवे. फिल्म आणि डिजिटलमधला फरक अजून बऱ्याच लोकांना नीट कळायचा आहे आणि तरी पण ५ डी, रेड, अलेक्सा वापरायच्या बाता मंडळी करत आहेत. आणि त्यासाठी त्यांचा युक्तिवाद असा आहे की डिजिटलमधे चित्रपट केला तर बजेट मोठ्या प्रमाणात कमी होते. हे सारं लिहिताना कुणाचीही कणभरदेखील चेष्टा करण्याचा हेतू नाही, कुणावरही बारीकशी टीकाही मला करायची नाही, मात्र आज नव्या तंत्रज्ञानाकडे पाहण्याचा आजच्या चित्रपटसृष्टीचा दृष्टिकोन कशाप्रकारचा आहे याकडे मात्र सर्वांचेच लक्ष वेधायचे आहे.

पु.ल.ना एकदा कुणी तरी विचारले, "तुम्हाला साहित्य, नाटक, संगीत, अभिनय इत्यादीतलं



कळतं...पण सिनेमातलं काय हो कळतं?'' पु. ल. म्हणाले, ''मनापासून सांगतो, मला खरंच सिनेमाचे तंत्र, त्याची भाषा वगैरे अजिबात कळत नाही. परंतु निर्माते येतात. आग्रह धरतात. मग मी चांगले अनुभवी तंत्रज्ञ घेतो आणि मला असं असं हवं असं सांगत सिनेमा करतो. परंतु एक बारीकशी गोष्ट मला जमते. मला गोष्ट सांगणं थोडंफार कळतं.''

एकदा गोष्ट सांगणं कळतं म्हटलं की त्यात आपसूकच सगळं आलं, मग ती सांगण्याचं तुमचं माध्यम कोणतंही असो. साहित्य, नाटक, सिनेमा की अन्य काही! पु.ल. नी नेमकं तेच सांगितलं. सिनेमा हे तंत्राधिष्ठित माध्यम जरी असलं आणि म्हणून मग रोजच नवनवं तंत्रज्ञान येत असलं तरी अंतिमत: आपण गोष्ट कशी सांगतो ते महत्त्वाचं. यासंदर्भात आणखी एक उदाहरण द्यावेसे वाटते.

दिल्लीतल्या एका आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात डिजिटलचे नवे तंत्रज्ञान फिल्मला मारक ठरणार का या विषयावर चर्चासत्र होतं. देश-विदेशातील बडीबडी मंडळी व्यासपीठावर आणि सभागृहात होती. डिजिटलने अनेकांच्या मनात संभ्रम आणि भयसुद्धा निर्माण केलं होतं आणि म्हणूनच गर्दी उसळली होती. हा म्हणजे अगदी जीवन-मरणाचाच प्रश्न आहे अशा थाटात चर्चा चालली होती. बोलणारे काही जण कोणत्याही क्षणी धाय मोकलून रडायला लागतील असे सगळे वातावरण होते. मला कळेचना की या भल्या भल्या मंडळीचे हे काय चालले आहे. अरे सिनेमा हे तंत्राधिष्ठित माध्यम म्हटल्यानंतर नवे तंत्रज्ञान येणारच, जुन्यातलं काही तरी काळाबरोबर वाहूनही जाणार, त्यात एवढं घाबरून जायचं कारण काय? सिनेमात सिनेमाची म्हणून जी भाषा आहे तीच वापरायची आहे ना गोष्ट सांगण्यासाठी? का ती ही पार मोडीत निघालीय? या चर्चासत्राच्या वेळी म्हणजे साधारणपणे दहाबारा वर्षांपूर्वी साधा व्हिडियो आला होता. त्यानंतर इतक्या झपाट्याने बदल झाले कि नवी पिढी मोबाइलच्या कॅमेऱ्याने फिल्म बनवायला लागली. आता केवळ मोबाईलवर बनविलेल्या चित्रपटांचे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव जगभर आयोजित व्हायला लागलेत. चित्रपटाच्या आरंभापासून म्हणजे १८९५ पासून ते अगदी या क्षणापर्यंत तंत्रज्ञान बदलत गेलं आणि त्यानुसार चित्रपटदेखील बदलत गेला. आता आपलं काय होणार म्हणून काही लोक भयभीत झालेत तर काही हे नवे तंत्रज्ञान वापरले म्हणजे आपण आधुनिक झालो अशा भ्रमात राहिले. मराठी चित्रपटसृष्टीत सध्या या दुसऱ्या प्रकारातले लोक अधिक प्रमाणात आहेत. त्यामुळे नवे तंत्रज्ञान वापरून निर्मितीमूल्ये सुधारत चित्रपट चकचकीत करण्याकडेच बऱ्याच मंडळींचा कल आहे. आशय आणि अभिव्यक्तीला काय आणि कितीसं महत्त्व द्यायचं? असाच सारा खाक्या! याकडे अधिक गांभीर्याने पहात काही एक आत्मपरीक्षण होणे गरजेचे आहे असे वाटते. नवीन तंत्रज्ञान वापरायचेच या हव्यासापायी चित्रपटाचे बजेट गरज नसताना वाढत नाही ना याचाही विचार करायला पाहिजे. मराठी चित्रपटाचे एक वास्तव आजही कायम आहे आणि ते म्हणजे थोडाफार अपवाद केला तर आजही मराठी प्रेक्षकांचा प्रतिसाद चित्रपटसृष्टीला पुरेसा बळ देणारा नाही. मग घातलेले पैसे मिळविण्यासाठी शासनाचे अनुदान आणि चॅनल्सचा आधार शोधावा लागतो. त्याचंही गणित किती व्यस्त आहे याचीही कल्पना समस्त चित्रपटकर्मीयांना आहेच. एकीकडे मोठमोठ्या जाहिराती, चॅनल्सवरचे प्रोमोज, चॅनेल्सवर सदासर्वकाळ चालू असलेला मराठी चित्रपटांचा रतीब आदी गोष्टींमुळे भरभराटीचे केवळ एक भ्रामक चित्रच समोर येते आहे याचा विचार निदान चित्रपटसृष्टीने तरी केला पाहिजे असे वाटते.

उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर यांनी एका चर्चासत्रात वाचलेल्या निबंधात अगदी सुरवातीलाच असे म्हटले होते की आपण युरोपमधल्या औद्योगिक क्रांतीकडून केवळ यंत्रे घेतली, यंत्रसंस्कृती नाही घेतली. बदलत्या, नव्या तंत्रज्ञानाचा वापर आज आपण ज्याप्रकारे करतो आहोत त्यातून याचीच प्रचीती येते आहे. मी वर म्हटल्याप्रमाणे इथे मला व्यक्तिश: कुणावरच टीका करायची नाही. कुणाचे गुणगान देखील करायचे नाही. कारण नावे आली की अशाप्रकारच्या चर्चा नको त्या मुद्यांभोवती रेंगाळत राहतात आणि लक्षात घ्यायच्या गोष्टी मागे पडतात.

हे जे काही मी लिहायला घेतले आहे त्याची व्याप्ती फार मोठी आहे हे मला लिहिण्यापूर्वी आणि आता लिहिता लिहिता स्पष्टपणे जाणवते आहे. त्यामुळे तेवढे सगळे इथे लिहिणे अवघड आहे. परंतु मराठी चित्रपटाला सर्वोतोपरी सहाय्य करणारे, सतत त्याच्या आधाराला येणारे महाराष्ट्र शासन आज जेव्हा राज्य चित्रपट पुरस्काराचा सुवर्णमहोत्सवी सोहळा साजरा करते आहे तेव्हा आपली चित्रपटसृष्टी नेमका कोणत्या अवस्थेतून जात आहे आणि आपण नेमके या संदर्भात काय करत आहोत याचे आत्मपरीक्षण वअहावे म्हणून हे काहींसे मुक्त विचार, मुद्दे आणि चिंतन ! शासनाच्या योगदानाचा मुद्दा निघालाच आहे तर पुढे जाण्याआधी यासंदर्भातला एक प्रसंग सांगतो.

रंगभवनाच्या एका पुरस्कार सोहळ्यात देव आनंद प्रमुख पाहुणे होते. पुरस्कारामागून पुरस्कार दिले जात होते. अधून मधून करमणूकीचे कार्यक्रम सादर केले जात होते. सोहळ्याच्या अखेरच्या पर्वात पुरस्कार द्यायला देवसाहेब रंगमंचावर आले. पुरस्कार देऊन होताच निवेदकाने, ‘देवसाब अब आपको बोलना है’ असे म्हणताच देवसाहेबांनी काहीशा घाईतच निवेदकाच्या हातून माइक घेतला आणि माननीय अमुक माननीय तमुक अशी औपचारीक सुरुवात न करता समोरच्याशी एका ऊर्मीने, एका सहजतेने बोलावे तसे ते बोलू लागले. ‘दोस्तो तीन घंटे वहाँ सामने बैठकर आपका ये अॅवार्ड फंक्शन देख रहा हूँ.. बडी खुशी हो रही है.. मगर एक बात बडी अजीब लग रही है... जो भी अॅवार्ड लेने आता है बस एक ही बात दोहराता है.. सरकार को हमें और पैसे देने चाहिये... अॅवार्ड की रकम बढानी चाहिये.. ग्रांट की रकम बढानी चाहिये..भाइयों एक बात बताना चाहता हूँ.. फिल्म सिर्फ पैसों से नहीं बनती है. फिल्म बनती है दिमाग और दिल से.’

आज मराठी सिनेमा कोटीची उड्डाणे करू लागला आहे. एका अर्थी ते स्वाभाविक आणि योग्यदेखील आहेच. परंतु खूप मोठं बजेट म्हणजे चांगला सिनेमा हे समीकरण बरोबर आहे का? आज बजेट वाढण्याची जी कारणे आहेत त्यातली दोन मुख्य कारणे अशी-पहिले म्हणजे मराठी सिनेमा म्हणजे गरीब, दीनवाणा अशी ही एक प्रतिक्रिया आहे आणि दुसरे म्हणजे आजची पिढी ही बऱ्यापैकी सुखवस्तू पार्श्वभूमी असलेली आहे. मराठी चित्रपट अगदी कालपरवापर्यंत गरीब, बापुडवाणा होता हे वास्तव अमान्य करताच येणार नाही. पण म्हणून त्याला भरजरी वस्त्रे नेसवून तो खऱ्या अर्थाने ‘श्रीमंत’ होणार आहे का, दिसणार आहे का ? पूर्वसूरींकडे पुरेसा पैसा नव्हता पण म्हणून त्याची प्रतिमा किंवा तिचा आविष्कार कमी पडला असे वाटते का? मराठीत आज कधी नव्हे इतका निर्मात्यांचा ओघ वाढला आहे. या नव्या निर्मात्यांकडे त्यांच्या त्यांच्या व्यवसायातून अमाप पैसा जमलेला आहे. त्यातले कोटी दोन कोटी गेले तरी त्यांना काही फरक पडत नाही. त्यांचे नुकसानही त्यांच्या लेखी नगण्य असते. परंतु या सर्वांचा विपरीत परिणाम एकूणच आपल्या चित्रपटसृष्टीवर होतो.

मला मध्यंतरी एक निर्माते भेटले. मी त्यांना म्हटले की माझे विचारणे आपणास काहींसे उद्धटपणाचे वाटेल परंतु तरीही विचारतो की आपण चित्रपट निर्मितीत का येता? ते म्हणाले की अहो कोटी दोन कोटीने काय जातंच आमचं. नाहीच झाला फायदा किंवा अगदी घातलेले पैसेसुद्धा आले नाही तर, म्हणेन शंभर फ्लॅटस बांधले त्यातले दोन पडून राहिले. त्यात काय एवढं मोठ्ठ! त्यांना नाही, परंतु चित्रपटसृष्टीसाठी, तिच्या भवितव्यासाठी ही फार मोठी चितेची बाब आहे. वारुळातून मुंग्या बाहेर याव्या तसे आलेले हे निर्माते हे चित्रपटसृष्टी कितीशी भरभक्कम करतील हा विचार करण्याजोगा विषय आहे. त्यांनी एक गोष्ट मात्र केली. आकडे फुगवले. कलावंत-तंत्रज्ञ

